11-08-2011 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SGB/ 10:30

11-08-2011 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A.1

SGB/ AKN/ MMP/ 10:30

सभापतीस्थानी - माननीय उप सभापती

पृ.शी.: महाराष्ट्रातील करोडो शेतकऱ्यांना कोरड्या किंवा ओल्या दुष्काळाला सामोरे जावे लागणे

मु.शी.: महाराष्ट्रातील करोडो शेतकऱ्यांना कोरड्या किंवा ओल्या दुष्काळाला सामोरे जावे लागणे या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर,दिवाकर रावते,विनोद तावडे, रामदास कदम,जयंत प्र.पाटील,संजय केळकर,सय्यद पाशा पटेल,डॉ.दीपक सावंत,श्रीमती शोभाताई फडणवीस डॉ.नीलम गोऱ्हे,सर्वश्री धनंजय मुंडे,चंद्रकांत पाटील, केशवराव मानकर,रामनाथ मोते,डॉ.रणजित पाटील, श्री.भगवानराव साळुंखे वि.प.स.यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु.....

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, गेल्या तीन वर्षापासून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कधी अवर्षण, कधी अतिवृष्टी तर कधी पिकावरील रोगराईच्या संकटांचा सामना करावा लागत आहे. खरे म्हणजे हे संकट शेतकऱ्यांच्या पाचवीला पुजले आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना 2009 मध्ये अवर्षणाचा सामना करावा लागला, 2010 मध्ये अतिवृष्टीचा सामना करावा लागला आणि 2011 मध्ये महाराष्ट्रातील प्रत्येक विभागामध्ये वेगवेगळी स्थिती निर्माण झाली. हवामान खात्याच्या अंदाजानुसार या वर्षी पावसाळा वेळेवर सुरु होईल असे जाहीर केले गेले. रोहिणी नक्षत्र आणि मृग नक्षत्रातही पाऊस पडला नाही. 7 जून रोजी मृग नक्षत्राला सुरुवात होते. त्या वेळेला पाऊस अपेक्षित असतो. 7 जुलै पर्यंत राज्यात पाऊस पडलाच नाही. काही भागात इतका अपुरा पाऊस पडला की, त्यामुळे पेरण्या होऊ शकल्या नाहीत. पर्यायाने खरिपाची पिके अडचणीत आली. कापूस, सोयाबीन, ज्वारी, तूर, उडीद, मूग ही सर्व पिके संकटात आली. 7 जुलैपर्यंत राज्यात खरीप पिकाच्या एकूण 132.34 लाख हेक्टर क्षेत्रापैकी फक्त 28.26 लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली. हे क्षेत्र एकूण खरीप क्षेत्राच्या 21 टक्के इतके आहे.

सभापती महोदय, पश्चिम विदर्भ, पूर्व विदर्भ, खानदेश, उत्तर महाराष्ट्र, कोकण किंवा पश्चिम महाराष्ट्रात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. पूर्व विदर्भात गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया आणि भंडारा जिल्हयात सरासरीपेक्षा खूपच कमी पाऊस झाला. त्यामुळे भात पिकाची रोवणी होऊ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शकली नाही. काही ठिकाणी रोवणी झाली परंतु पिकावर कीड पडली. पश्चिम विदर्भ हा व-हाड प्रांत हा पांढरे सोने म्हणजे कापूस पिकविणारा प्रदेश आहे. या पश्चिम विदर्भात एक महिना

श्री.पांडुरंग फुंडकर.....

उशिराने पावसाला सुरुवात झाली. त्यामुळे कापसाच्या पेऱ्यावर त्याचा परिणाम झाला. बीटी बियाणे उशिरा मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना धूळ पेरणी करता आली नाही. ज्या ठिकाणी पाटबंधाऱ्याची सोय नाही अशा भागामध्ये शेतकऱ्यांना कापूस पेरणी करता आली नाही. 7 जुलैपर्यंत अकोला, वाशिम, यवतमाळ, अमरावती आणि बुलढाणा जिल्हा हा संपूर्ण कापसाचा पट्टा आहे, या पट्टयात पाऊस एक महिना उशिराने आल्यामुळे कापसाचा पेरा कमी झाला. त्या भागातील शेतकरी सोयाबीन पिकाकडे वळले. जुलै महिन्यात पेरणी झाल्यामुळे उडीद व मूग पिकांना फटका बसला.

सभापती महोदय, खानदेशात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी आहे. त्यामुळे तेथील पिकावर परिणाम झाला. तेथे पेरणी विलंबाने झाली. निसर्गाची किमया काय आहे हेच कळून येत नाही. 15 जुलै पूर्वी पाऊस आलाच नाही आणि 15 जुलै दरम्यान खूप पाऊस झाला. खामगाव आणि शेगाव तालुक्यात या एकाच दिवशी 160 मी.मी.पाऊस झाला. सगळीकडे पाणीच पाणी झाले. त्याचा परिणाम असा झाला की, जमिनींवर, नद्या आणि नाल्यांना प्रचंड प्रमाणात पूर आला. किमान 2000 हेक्टरपेक्षा जास्त जमीन खरडून गेली. घरे पुराच्या पाण्यात वाहून गेली.

सभापती महोदय, माननीय कृषी मंत्री श्री.विखे पाटील यांना मी विनंती करणार आहे. कृषी मंत्री पद स्वीकारल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नामध्ये लक्ष घातले. शासन परिपत्रक क्रमांक-सीएलएस 5983/246381/प्र.क्र.820/एम.3, दिनांक 29 जानेवारी, 1983 अन्वये अतिवृष्टी घोषित करावी लागते. या जी.आर.नुसार अतिवृष्टी घोषित करणे आवश्यक होते. त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. खामगाव तालुक्यातील 11 गावातील 500 हेक्टर, चिखली तालुक्यातील 36 गावातील 6200 हेक्टर, शेगाव तालुक्यातील 16 गावातील 1500 हेक्टर, मोताळा तालुक्यातील 24 गावातील 3058 हेक्टर आणि नांदूरा तालुक्यातील 4 गावातील 300 हेक्टर अशी एकूण 5700 हेक्टर जमीन खरडून गेली. संपूर्ण कसदार जमीन वाहून गेली.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

फक्त खालचे खडक या खरडून गेलेल्या जमिनीत शिल्लक राहिल्याचे दिसत आहे. अशी खरडून गेलेली जमीन दुरुस्त होण्यासाठी जवळपास 10 वर्षांचा कालावधी लागतो. बुलढाणा व देऊळगांव राजा या भागातील पावसाची आकडेवारी सांगून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. पण शासनाने अतिवृष्टी झालेल्या भागातील शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी जे 31 जानेवारी 1983 चे परिपत्रक काढले आहे त्यानुसार निर्णय घेणार की नाही हा माझा प्रश्न आहे. या परिपत्रका नुसार 24 तासाच्या कालावधीत 65 मि.मि. पेक्षा जास्त पाऊस पडला असल्यास अतिवृष्टी झाली असे समजण्यात यावे, पण त्यानुसार शासन निर्णय घेणार की नाही याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे.

महोदय, एखाद्या गावात 65 मि.मि. पेक्षा जास्त पाऊस झाला तरच अतिवृष्टी झाली असे शासनाचे नियम आहेत. मग मी या निमित्ताने शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, आमच्या बुलढाणा जिल्ह्यातील बुलढाणा-125 मि.मि.,देऊळगांव राजा-118 मि.मि., सिंदखेड राजा-102 मि.मि. पुन्हा 8 जुलै रोजी बुलढाणा-166 मि.मि., देऊळगांव राजा-68 मि.मि., सिंदखेड राजा-73 मि.मि. मेहेकर-72 मि.मि., मोताळा-102 मि.मि.,जळगांव-जामोद-66 मि.मि., खामगांव-99 मि.मि., शेगांव-162 मि.मि. एवढा पाऊस पडला, मग याला अतिवृष्टीचे निकष लागणार नाहीत काय, याचा खुलासा झाला पाहिजे. विदर्भात ही परिस्थिती आहे. मराठवाड्यात तर सुरुवातीला पावसाने हुलकावणी दिली. बऱ्याच ठिकाणी अवर्षणामुळे दुबार पेरण्या कराव्या लागल्या. बीड आणि लातूर जिल्ह्यातील परिस्थिती तर खूपच तीव्र होती. कोकण विभाग तर अतिवृष्टीने त्रस्त झालेला आहे. कोकणातील सर्वच जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस झालेला आहे. कोकणातील नद्या, तलाव व धरणे पुरेपूर भरले आहेत. या अतिवृष्टीमुळे रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भातशेती पूर्णपणे पाण्याखाली गेली. अशा प्रकारे संपूर्ण राज्यातील शेतकरी निसर्गाच्या अवकृपेमुळे संकटात सापडला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील स्थिती काही वेगळी नाही. मग कोकण, उत्तर महाराष्ट्र, खान्देश, विदर्भ किंवा पश्चिम महाराष्ट्र असो, या संपूर्ण भागातील शेती निसर्गाच्या लहरीप्रमाणे अडचणीत आली आहे. माझा या निमित्ताने माननीय कृषी मंत्र्यांना असा सवाल आहे की, या संपूर्ण बाबीची माहिती आपण घेतली असेलच. ज्या ठिकाणी जमीन खरडून गेली त्या भागातील नुकसानीचे पंचनामे केले आहेत काय, जेथे घरे वाहून गेली त्यांना नुकसान भरपाई दिली काय या सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

महोदय, मला माहिती आहे की, शासनाने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी जे परिपत्रक काढलेले आहे त्यानुसार प्रति माणसी 1000 रुपये आणि जास्तीत जास्त 5000 रुपये एवढीच मदत दिली जाते. मग घरात 10 लोक असतील तर त्यांना 10000 रुपये मिळत नाहीत. खरे तर हे निकष खूप जुने आहेत, परिस्थितीनुसार त्यात बदल करण्याची गरज आहे. राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याचा सन 1983 चा जी.आर. आपण किती दिवस चालू ठेवणार आहात, तो बदलणार की नाही याचा खुलासा करावा. कारण आजही राज्यातील शेतकरी झालेल्या नुकसानीपोटी मायबाप सरकारकडून भरीव मदत मिळेल अशी भाबडी आशा बाळगून आहे, पण शासन मात्र त्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम करते असे म्हटले तरी चालेल. मागील वर्षी सन 2010 मध्ये पावसाने सुरुवात चांगली केली, नंतर मात्र इतका पाऊस पडला की शेतकऱ्याच्या डोळ्यात पाणी आले.

महोदय, अशा प्रकारे निसर्गाची अवकृपा झाल्यानंतर सरकार मदत करील अशी अपेक्षा असते पण या शेतकऱ्याला मात्र सुरुवातीला 1000 कोटीचे पॅकेज जाहीर केले. नंतर मात्र त्यात शासनाने हुशारी केली व सन 2008-09 ची नुकसान भरपाई सुध्दा समाविष्ट केली. वास्तविक सन 2010 मध्ये झालेल्या नुकसानीपोटीच हे 1000 कोटीचे पॅकेज राज्यातील शेतकऱ्यांना देण्याची गरज होती. पण त्यापैकी शासनाने फक्त 742 कोटी रुपये दिले, त्यात सुध्दा 400 कोटी रुपये केंद्र शासनाने दिलेले समाविष्ट आहेत. त्यातून 100 कोटीची रक्कम अद्याप द्यावयाचीच आहे. याचा अर्थ या शासनाने फक्त 242 कोटी एवढीच मदत मागील दोन वर्षाच्या नुकसान भरपाईपोटी शेतकऱ्यांना दिली, घोषणा मात्र 1000 कोटीची मदत केल्याची करण्यात आली.

महोदय, हे अतिवृष्टीचे पंचनामे त्या त्या भागातील ग्रामसेवक किंवा तलाठी यांनी केले व त्याच्याच आधारे या पॅकेजचे वाटप करण्यात आले. हे सर्व्हेक्षण चुकीचे करुन सन 2010 मध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना फसविण्यात आले. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी घोषित केलेले पॅकेज तरी पूर्ण झाले काय हा आणखी एक महत्वाचा प्रश्न आहे. मागील अधिवेशनात विधानसभेत शासनाने घोषणा केली होती की, या प्रकरणात 405 अधिकारी, त्यात कृषी अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. हे कृषी विभागाचे अधिकारी यामध्ये दोषी आढळून आले असे सांगण्यात आले होते.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दि. 21.3.2011 रोजी सभागृहात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा विषय उपस्थित करण्यात आला होता व त्यावर आपणच मंत्री म्हणून उत्तर दिले होते. आपण तेव्हा असे म्हणाला होता की, सदर अहवालात काही अनियमितता झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या संदर्भात कृषी आयुक्त यांच्या दि. 18 ऑक्टोबर, 2010 च्या आदेशान्वये मूळ दस्तऐवज ताब्यात घेऊन तपासणी करण्यासाठी विभागीय कृषी सह संचालक, एक संचालक व प्रशासन अधिकारी यांचे चौकशी पथक नेमण्यात आले आहे. या पथकाने या संपूर्ण अभिलेख्यांची छाननी केली व कृषी आयुक्त यांनी दिलेल्या सुचनेनुसार विभागीय सह संचालक, अमरावती यांच्या स्वाक्षरीने सकृतदर्शनी जबाबदार असलेले 405 अधिकारी व कर्मचारी यांना दि. 28.11.2010 ते दि. 30.11.2010 या कालावधीत कारणे दाखवा नोटिसेस पाठविण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने पुढील कारवाई कृषी आयुक्तालयाच्या स्तरावर चालू आहे. या 405 कृषी अधिकारी व कर्मचाऱ्यांना ज्या कारणे दाखवा नोटिसेस इश्यू करण्यात आल्या त्याची उत्तरे अद्याप शासनाला प्राप्त होणे आवश्यक होती, ती प्राप्त झाली आहेत काय, असल्यास त्यांच्यावर नियमानुसार कोणती कारवाई झाली, किती लोकांना निलंबित वा बडतर्फ करण्यात आले असा कोणताही खुलासा शासनाच्या वतीने करण्यात आलेला नाही. शेतकऱ्यांच्या टाळूवरील लोणी खाऱ्या अधिकाऱ्यांची अशा प्रकारे शासन केवळ चौकशीच करणार असेल तर हे अधिकारी मोकाट सुटल्याशिवाय राहणार नाही. म्हणून या 405 अधिकाऱ्यांवर पुढे कोणती कारवाई करण्यात आली, ज्यांनी शेतकऱ्यांसाठी असलेल्या पॅकेजची ऐशी-तैशी केली, ते पॅकेज शेतकऱ्यांपर्यंत पोहचू दिले नाही असे हे झारीतील शुक्राचार्य कोण आहेत या सर्व प्रश्नांची उत्तरे या प्रस्तावाच्या निमित्ताने मिळाली पाहिजेत.

महोदय, एवढेच नाही तर या पॅकेजच्या संदर्भात मी सभागृहाच्या आणखी एक बाब निदर्शनास आणून देत आहे की, कनिष्ठ अधिकाऱ्यापेक्षा पॅकेजमध्ये निकृष्ट दर्जाच्या वस्तू खरेदी करणारे जिल्हा कृषी अधिकारी, सह संचालक व संचालक यांच्यावर सुध्दा कारवाई होणे आवश्यक आहे. पॅकेजमधील वस्तुंची गुणवत्ता न तपासता ज्या वस्तू घेण्यात आल्या त्यांच्यावरही कारवाई होणे आवश्यक आहे. जाणीवपूर्वक या निकृष्ट दर्जाच्या वस्तुंची खरेदी केली म्हणून महाराष्ट्र स्टेट

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन, महाराष्ट्र स्टेट ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन आणि महाराष्ट्र स्टेट स्मॉल स्केल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन या महामंडळाची चौकशी करण्याचे सुध्दा आदेश देण्यात आले होते. कारण त्यांनीच या संपूर्ण वस्तू पुरविल्या, याचा अर्थ यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला. तसेच आणखी या प्रकरणाच्या खोलात जाऊन चौकशी केली तर कदाचित आयएएस दर्जाचे अधिकारी सुध्दा दोषी आढळून येतील अशी मला शंका आहे. अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या तोंडातला घास ज्या अधिकाऱ्यांनी काढला, हे अधिकारी कोण आहेत हे सांगण्याचे धारिष्ट्य मंत्री महोदय करतील काय हा खरा प्रश्न आहे. कारण यापुढे अशा गोष्टी या राज्यात सहन केल्या जाणार नाहीत. अन्नदाता शेतकऱ्याच्या तोंडातला घास काढणारे जे कोणी असतील त्यांच्यावर ताबडतोब कारवाई झाली पाहिजे, अशी माझी मागणी आहे. शेतकऱ्यांच्या पाचवीलाच हे संकट पुजलेले आहे, कारण एका बाजूला निसर्ग मारतो तर दुसऱ्या बाजूला त्याला सरकार सुध्दा मारते.

महोदय, बी-बियाणे व खते यांची टंचाई दरवर्षी सुध्दा निर्माण करण्यात आली होती. तसेच बोगस बियाण्याचा पुरवठा झाला असल्याची सर्वांनाच जाणीव आहे. सोयाबीनचे बियाणे पुरविण्याच्या संदर्भात चर्चा करीत असताना हा मुद्दा उपस्थित झाला होता की पहिल्यांदा बी.टी. कापसाच्या जातीबाबत चर्चा झाली. सुरुवातीला 2 जून रोजी या बियाण्याची ऑर्डर देण्यात आली. वास्तविक 2 जूनच्या सुमारास कापसाची प्रत्यक्ष पेरणी करावी लागते, पण त्या वेळी मात्र बियाणे पुरविण्याबाबतची ऑर्डर एवढ्या उशिरा दिली गेली. पण बी.टी. कापसाचे बियाणे पुरविणाऱ्या कंपन्यांनी मात्र शासनाला वेठीस धरले .....

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

बियाणे पुरवठा करणा-या कंपन्यांनी सरकारला वेठीला धरुन सांगितले की, आमच्या बियाण्यांच्या किमती वाढवून दिल्या नाही तर आम्ही बियाण्यांचा पुरवठा करणार नाही. सरकारला या कंपन्यांशी कॉम्प्रमाईज करुन बियाण्यांच्या किंमती वाढवून द्याव्या लागल्या. बियाण्यांच्या किंमती वाढवून दिल्यानंतरही या बियाणे कंपन्यांनी बियाण्यांचा पुरवठा वेळेवर केला नाही. कपाशीचे बियाणे वेळेवर न मिळाल्यामुळे ब-याच शेतक-यांनी सोयाबीनची लागवड केली. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळात सरकारचे 51 टक्के शेअर्स आहेत. महाराष्ट्राला बियाणे पुरवण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळावर आहे. या बियाणे महामंडळाच्या माध्यमातून शेतक-यांना बियाण्यांचे प्लॉट दिले जातात व त्या प्लॉटमधून निर्माण झालेले बियाणे पुन्हा शेतक-यांना बियाणे म्हणून पुरवले जात असते.

सभापती महोदय, या ठिकाणी मी जबाबदारीने आरोप करीत आहे की, या महामंडळाने सोयाबीनच्या बियाण्यांचे प्लॉट शेतक-यांना न देता त्यांनी मध्य प्रदेशच्या मार्केटमधून बियाणे खरेदी केले. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विकण्यासाठी आलेल्या सोयाबीनच्या संदर्भात बोगस कंपन्या निर्माण करुन त्यांनी हे बियाणे निर्माण केले व तेच बोगस बियाणे महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाला पुरवले गेले परंतु या पुरवण्यात आलेल्या बियाण्याची कुठल्याही प्रकारची गुणवत्ता तपासली गेली नाही, उगवण क्षमता किती आहे हे तपासले गेले नाही. सोयाबीनचे जसे बियाणे आले तसेच ते थैल्यात भरले गेले व ते बियाणे थेट शेतक-यांना देण्यात आले. खरे म्हणजे या बियाण्यांची उगवण शक्ती नसतांना या बियाण्यांचे वाटप शेतक-यांना केले गेले. सदर सोयाबीनचे बियाणे हे प्लॉटचे बियाणे नव्हते तर ते मध्यप्रदेशच्या मार्केटमधून खरेदी केलेले बियाणे होते. त्यामुळे या सोयाबीनच्या बियाण्यांच्या बाबतीत पूर्ण महाराष्ट्रात बोंब झाली. या बोगस बियाण्यांमुळे मराठवाडयातील, विदर्भातील शेतकरी डुबला याला कोण जबाबदार आहे ? बियाणे महामंडळ जर अशा पध्दतीने शेतक-यांची फसवणूक करीत असेल तर आपण या बियाणे महामंडळावर कारवाई करणार आहात की, नाही ? या बियाणे महामंडळाकडून सतत भ्रष्टाचार सुरु आहे. बियाणे महामंडळाचा अत्याचार आपण कशासाठी सहन करीत आहोत ? हे राज्य शेतक-यांचे असतांना या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

राज्यातील शेतक-यांची फसवणूक महाराष्ट्र बियाणे महामंडळाकडून होत असेल तर हे बियाणे महामंडळ बरखास्त केले पाहिजे. खरे म्हणजे या बियाणे महामंडळावर आयएएस अधिका-याची नियुक्ती केली तरच या महामंडळाचा कारभार चांगल्या पध्दतीने चालू शकेल अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, 2 ऑगस्ट, 2011 रोजी या सभागृहात बीटी बियाण्यांच्या संदर्भात चर्चा सुरु असतांना माननीय कृषी मंत्र्यांनी जाहीर केले होते की, "मार्च 2012 पर्यंत राज्यातील कोणत्याही सीड कंपन्यांनी व्यापा-यांकडून अगाऊ बुकिंग करुन पैसे घेऊ नयेत अशा प्रकारच्या सक्त सूचना आम्ही कंपन्याना दिलेल्या आहेत" असे जाहीर केले होते. तसेच आपण असेही जाहीर केले होते की, "बियाण्यांच्या संदर्भात राज्यांबरोबर एमओयु तसेच बियाण्यांची उपलब्धता किती आहे ते सांगावयाचे व सरकारच्या संमतीने मार्च 2012 नंतर बियाण्यांची बुकिंग करुन बियाणे उपलब्ध करुन द्यावे, पैसे घेऊन व्यापारी व शेतक-यांना लुटण्याचा जो प्रयत्न यापूर्वी केला जात होता तो आता थांबणार आहे" असे सुध्दा आपण जाहीर केले होते. आपण बियाण्यांच्या संदर्भात जी घोषणा केली होती त्या प्रमाणे आपण काम करणार आहात काय ?

सभापती महोदय, मल्लिका हे कपाशीचे बीटी बियाणे आहे. या बियाण्यांचे आपल्या घोषणेनंतर 125 कोटी रुपयांचे बुकिंग झालेले आहे. एकटया बुलढाणा जिल्हयात 18 कोटी रुपयांच्या बियाण्याचे बुकिंग झालेले आहे. व्यापा-यांबरोबर कंपन्यांनी बियाण्यांचे बुकिंग करु नये असे आपण जाहीर केल्यानंतर सुध्दा या कपंन्याना व्यापा-यांबरोबर बुकिंग करण्याची परवानगी कोणी दिली होती ? 125 कोटी रुपयांच्या बीटी बियाण्यांचे बुकिंग केले व त्यास कोणी परवानगी दिली याची आपण चौकशी करण्याची आवश्यकता आहे. या राज्याचे कृषी मंत्री जाहीर करतात की, मार्च 2012 पर्यंत कोणालाही बियाण्यांची बुकिंग करता येणार नाही तरी सुध्दा या कंपन्या व्यापा-यांबरोबर 125 कोटी रुपयांची बुकिंग कसे काय करु शकतात ? बोगस बियाण्यांमुळे या राज्यातील शेतकरी वर्षानुवर्षा पासून नागवला जात आहे. राज्यातील शेतकरी दुष्ट चक्रात सापडलेला आहे. शेतक-यांना एका बाजूने चांगले बियाणे मिळत नाही, बियाणे मिळाले तर ते बोगस मिळते, दुस-या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

बाजूला पाऊस वेळेवर येत नाही. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ तर कधी रोगराई या संकटांना शेतक-याला सामोरे जावे लागते. समजा एवढे सहन करुन माल पिकवला तर त्याच्या मालाला भाव सुध्दा मिळत नाही. हे मायबाप सरकार शेतक-याला सहकार्याचा हात देत नाही.

महाराष्ट्रातील शेतक-याला अशा संकटातून सोडवायचे असेल तर मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, कर्नाटक सरकारने आता कृषीसाठी स्वतंत्र बजेट तयार केले आहे. आंध्रप्रदेश राज्याने कृषीसाठी एक चांगले धोरण केलेले आहे. निसर्गाच्या कृपेवर अवलंबून असलेल्या शेतक-याला ख-या अर्थाने संरक्षण द्यावयाचे असेल तर त्यासाठी सर्वंकष पीक विमा योजना लागू करण्यची आवश्यकता आहे. शेतक-यांना पीक विमा योजना का लागू होत नाही ? प्रत्येक उद्योगाला, सोन्याच्या दुकांनांना, मोटर सायकलला, सायकल, माणसाला, जिनिंग प्रेसिंग, सुत गिरणी, कुकुट पालन या सर्वांना विमा दिला जातो परंतु शेतीला विमा दिला जात नाही. शेती हा धंदा नाही काय ? शेतक-याला आतापर्यंत विमा योजना लागू झालेली नाही. जो मोटर सायकल चालवतो त्याला विमा आहे परंतु जो काबाड कष्ट करतो, रक्त आटवतो, घाम गाळतो, बैलासारखी मरमर मेहनत करतो अशा शेती धंद्याला मात्र विमा योजना लागू करण्यात आलेली नाही. शेती धंद्याला आपण विम्याचे संरक्षण देणार आहात की, नाही ?

माझी शासनाला विनंती आहे की, आपण सर्व गोष्टी बाजूला सारा, शेतक-याला तुमची मदत नको आहे, पॅकेज नको, शेतक-याच्या समोर तुकडे टाकलेले शेतक-याला अजिबात आवडत नाही परंतु मजबुरी आहे. शेतक-याला स्वाभिमानाने जगू द्यावयाचे असेल तर सर्वंकष पीक विमा योजना शेतक-यांसाठी लागू करण्याची आवश्यकता आहे. सर्वंकष पीक विमा योजना या राज्यातील शेतक-यांसाठी शासन लागू करणार आहे काय ? नाइलाजाने आम्हाला अतिवृष्टी व अवर्षणाच्या चर्चा या सभागृहात आम्हाला घडवाव्या लागतात. उद्योग धंद्याला शासन करोडो रुपयांची सूट देत असते तर मग आपण शेतक-यांसाठी का सूट देत नाही ? उद्योग धंद्यासाठी शासन पाणी, वीज, जमीन, मालाचे भाव ठरविण्याचा अधिकार देते, मार्केटींगची व्यवस्था करुन देते. परंतु या राज्यातील शेतक-याला उद्योगधंद्यासारखे कोणत्याही प्रकारचे संरक्षण मिळत नाही एवढेच मला या ठिकाणी खेदाने सांगावे लागत आहे. या राज्यातील शेतक-याला संकटापासून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

वाचवावयाचे असेल तर या राज्यामध्ये सर्वंकष पीक विमा योजना लागू झाली पाहिजे अशी मी मागणी करतो. अतिवृष्टीमुळे या हंगामात शेतक-यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. जमीन खरडली गेल्यामुळे जमिनीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असून हे नुकसान 10 वर्षे तरी भरुन येणार नाही. या जमिनीची पोत 10-10 वर्षे तरी सुधारणार नाही. त्यामुळे ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे अशा शेतक-याना हेक्टरी 25 हजार रुपयांची मदत शासनाने करावी अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, शेतक-यांच्या विषयावर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. मला अत्यंत खेदाने या ठिकाणी विषय उपस्थित करावा लागत आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विदर्भातील शेतक-यांची उध्वस्तता तसेच शेतक-यांच्या पॅकेजमध्ये करण्यात आलेला भ्रष्टाचार याची माहिती आपल्या भाषणात मांडली आहे. या पुढचा अध्याय सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम मांडणारच आहेत.

सभापती महोदय, जानेवारी 2011 पासून विदर्भामध्ये 158 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. 158 आत्महत्यांपैकी केवळ 17 आत्महत्या शासनाने मान्य केलेल्या आहेत. 17 जुलै, 2011 ते 31 जुलै, 2011 या कालावधीत रमेश बाबुराव जुंभळे-17 जुलै 2011, किसन अमृते माने 18 जुलै 2011, पुरुषोत्तम गठसकर 20 जुलै 2011,

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.भगवान साळुंखे)

श्री.दिवाकर रावते..

तुकाराम हरिभाऊ इंगळे 20 जुलै, नथु नारायण झाडे, 20 जुलै, राजू सांगोले 20 जुलै, मोहन भाकरे 22 जुलै, कृपालू नरेडी 22 जुलै, किसन राठोड, 22 जुलै, लालू कोतू आत्राम, 22 जुलै, प्रमोद किसन गाऊत्रे, 24 जुलै, सुदाम राठोड 27 जुलै, दिवाकर वानखेडे 27 जुलै, ओंकार पारसकार,28 जुलै, अनिल ढोंगे, 28 जुलै, बाबूलाल पवार 28 जुलै, शंकर तुमारे 29 जुलै, देविदास गांगुलवार, 30 जुलै, विठोबा मडावी 30 जुलै, विजय सातपुते 31 जुलै 2011 या शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. यवतमाळ जिल्ह्यामध्ये 10, अमरावती जिल्ह्यामध्ये 5, अकोला जिल्ह्यामध्ये 2 आणि या महिन्याच्या 1 तारखेपासून 10 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. त्याची यादी देखील माझ्याकडे आहे.

सभापती महोदय, विदर्भातील शेतकऱ्यांना पॅकेज देऊन त्यांना वाऱ्यावर सोडले, त्याचा हा पुरावा आहे. पॅकेज देऊनही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत. आजही शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु आहेत. शासनाच्या पॅकेजचा शेतकऱ्यांना दिलासा वाटत नाही. विद्यमान कृषी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील हे युतीच्या काळात देखील कृषी मंत्री होते. तेव्हा मी मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचा अध्यक्ष होतो. मी त्यावेळी युती शासनाचा कारभार लांबून पाहत होतो. त्यावेळी सरकार म्हणजे काय मला माहीत नव्हते. युती शासनाच्या काळात मंत्रिमंडळाची बैठक संभाजीनगरमध्ये झाली होती. त्यावेळी शासनाने कृषी धोरण ठरविले होते. त्या धोरणाचा मसुदा कोठे पाठवावयाचा म्हणून तो माझ्या संभाजीनगर कार्यालयातील फॅक्सवर पाठविण्यात आला होता. त्या फॅक्सची एक प्रत काढून मी वाचली. ते कृषी धोरण वाचून मी फार प्रभावित झालो. कृषी धोरण काय आहे हे शेतकऱ्यांना सांगण्याकरिता मी नांदेड येथे पाच लाख शेतकऱ्यांचा मेळावा घेतला होता.

सभापती महोदय, यापूर्वी बोंड अळीमुळे नुकसान झालेल्या पिकांची कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळत नव्हती. परंतु युती शासनाच्या काळात बोंड अळीमुळे नुकसान झालेल्या पिकांची नुकसान भरपाई देण्याचा निर्णय आपणच कृषी मंत्री असताना घेतला होता. बोंड अळीचा प्रश्न सुटला परंतु इतर रोग वाढले आहेत हा भाग वेगळा.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

सभापती महोदय, मला आठवते की, गाळप न झालेल्या ऊसाला 5 हजार रुपये हेक्टरी भाव दिला जात होता. परंतु मी अनेक जिल्ह्यांमध्ये दौरा करीत असताना अनेक शेतकऱ्यांनी ही मदत 25 हजार रुपयांपर्यंत वाढविण्याची मागणी केली होती. तेव्हा आपल्या कारकीर्दीत आपण गाळप न झालेल्या ऊसाला हेक्टरी 25 हजार रुपये देण्याचा निर्णय घेतला होता.

सभापती महोदय, त्यानंतर माननीय कृषी मंत्री महोदयांनी मुंबई शहरामध्ये एक भव्य कृषी प्रदर्शन भरविले होते. त्या प्रदर्शनामध्ये ग्रामीण भागातील शेतकरी कसे काम करतात, त्यांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते वगैरे सर्व बाबी त्या प्रदर्शनात मांडण्यात आल्या होत्या. या प्रदर्शनाची भव्यता इतकी मोठी होती की, ते आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रदर्शन असल्याचे वाटत होते. या सर्व बाबी आपण युती शासनात कृषी मंत्री असताना केल्या होत्या.

सभापती महोदय, युती शासनामध्ये जे कृषी धोरण जाहीर करण्यात आले होते त्यामध्ये कृषी रस्ते असा विषय होता. शेतकऱ्यांचा माल शेताच्या बांधापासून थेट बाजारात आणण्याची व्यवस्था करण्यात आली होती. विद्यमान मंत्री आता आघाडी सरकारमध्ये देखील कृषी मंत्री आहेत. आम्हाला त्यांच्याकडून काही अपेक्षा आहेत.

सभापती महोदय, सचिव जर चाणाक्ष असतील तर ते मंत्री महोदयांना कालानुरुप धोरण बदलण्यासाठी मार्गदर्शन करतात. कारण त्यांच्याकडे खालच्या स्तरापासून सर्व माहिती उपलब्ध होत असते आणि ते ही सर्व माहिती माननीय मंत्री महोदयांपर्यंत पोहोचवित असतात. आपल्या सुदैवाने कृषी विभागाचे सचिव श्री.गोयल हे अतिशय चांगले अधिकारी आहेत. मंत्री महोदयांना देखील या विभागाचा चांगला अनुभव आहे. तेव्हा या दोघांच्या अनुभवाचा फायदा कृषी विभागासाठी व्हावा अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, मी या सभागृहाचा सदस्य झाल्यापासून पाहत आलो आहे की, ब्रिटीशांच्या काळात लागू झालेल्या आणेवारीमध्ये बदल करावा अशी मागणी सातत्याने होत आहे. ही मागणी दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांकडून होत आहे. मला आठवते की, तत्कालीन महसूल मंत्री श्री.नारायण राणे यांनी सभागृहात सांगितले होते की, "ही आणेवारी बदलल्याशिवाय

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

मी स्वस्थ बसणार नाही." परंतु आता त्यांच्याकडे दुसऱ्या विभागाचा कार्यभार असल्यामुळे त्यांना स्वस्थ बसण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. तेव्हा मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, आपल्याला जर क्रांतिकारी निर्णय घ्यावयाचा असेल तर आपण प्रथम ब्रिटीश काळापासून सुरु असलेल्या आणेवारीमध्ये बदल केला पाहिजे. आपण मंत्रिमंडळात ही बाब मंजूर करुन घेतली पाहिजे. आपणासहित आपल्या कुटुंबातील सर्वांना शेतीची जाण आहे. महाराष्ट्रातील शेतकरी आपल्याकडे अपेक्षेने पाहत आहेत. आपण आणेवारीमध्ये बदल घडवून आणल्यास हा बदल शेतकऱ्यांसाठी मोठे वरदान ठरणार आहे. आज काही शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी फक्त 5-10 रुपयांचे चेक मिळत आहेत ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. आपल्या नव्या धोरणामुळे निश्चितच शेतकऱ्यांना फायदा मिळेल. तेव्हा मी आपल्याकडून या धोरणाची अपेक्षा व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, गेल्या दहा वर्षात अनेक गोष्टी बदलल्या आहेत. हवामानात बदल झाले, ऋतुमानात फरक पडलेला आहे. परंतु ब्रिटीश काळापासून चालत आलेल्या आणेवारीमध्ये फरक झालेला नाही. या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी शेतकऱ्यांवर काय परिस्थिती ओढवलेली आहे हे सांगितले. मी काही जिल्ह्यांचा दौरा करुन शेतकऱ्यांवर ओढवलेल्या परिस्थितीचा आढावा घेतलेला आहे. जर शेतकऱ्याचा 15 हेक्टरवरील पेरा उगवला नसेल आणि त्यांना काहीच मदत मिळत नसेल तर त्यांच्या पुढे आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय राहत नाही. कारण त्याने बियाण्यांसाठी कर्ज काढलेले असते, खतांसाठी कर्ज काढलेले असते, मजुरांची देणी दिलेली असतात. शेतकऱ्यांना खरीप हंगामाचे पीक काहीही मिळाले नाही तर तो काय करणार आणि 15 हेक्टरची बाब शासनाच्या निकषात बसत नाही. तेव्हा अशाप्रकारे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत मिळण्याच्या कक्षेत आणणार आहात की नाही ? माझे खरिपाचे पीक पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्यावर मी कशासाठी जगायचे, असा शेतकऱ्यां समोर प्रश्न उभा राहतो. बी-बियाणे, खतांसाठी कर्ज घेतलेले असते. एवढा खर्च केल्यानंतर अपेक्षित पीक जेव्हा उद्ध्वस्त होते आणि पुन्हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

कोणताही पेरा होत नाही अशा शेतकऱ्यांना शासन कोणता दिलासा देणार आहे ? तेव्हा आणेवारीच्या निकषात बदल करण्याबाबत आपण अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन, मंत्रिमंडळापुढे हा विषय नेऊन आणेवारीच्या निकषाबाबत धोरणात्मक बदल करण्याबाबत निर्णय घ्यावा, अशाप्रकारची मागणी घेऊन मी आपल्यापुढे उभा आहे.

सभापती महोदय, मी याठिकाणी एका अपेक्षेने भाषण करीत आहे. याचा अर्थ पूर्वीचे कृषी मंत्री काही काम करीत नव्हते असे नाही, परंतु वारंवार सांगूनही काही घडले नाही. विद्यमान मंत्री महोदयांकडून आमच्या काही अपेक्षा आहेत. या वर्षी आम्हाला कृषी विभाग काम करताना दिसला. या वर्षी खतांकरिता धाडी पडल्या, बी-बियाणांसाठी धाडी पडल्या, परंतु त्यांनी सर्वच ठिकाणी चांगले काम केले असे मी म्हणणार नाही. परंतु अधिकारी काम करताना दिसत होते. आमचे नियंत्रण आहे असे त्यांनी व्यापाऱ्यांना सांगण्याचे काम केलेले आहे. या विभागामध्ये कृती करण्यासारखी कामे आहेत हे आपल्याकडे कृषी विभागाचा कार्यभार आल्यानंतर आपण दाखवून दिले आहे. मला मनापासून चांगले वाटले. याबद्दल मी आपले व्यक्तीश: आभार मानलेले आहेत. भविष्यात या बाबी अशाच सुरु राहिल्या तर शेतकऱ्यांचे हित साधले जाईल. आपण करीत असलेल्या कामामुळे काळाबाजार करणाऱ्यांवर वचक बसणार आहे.

सभापती महोदय, सोयाबीन बियाचे 100 टक्के बुकींग झाले. बाजारात फक्त 9 टक्के बियाणे आले. बी-बियाणांचे उत्पादन हे कारखान्यातील उत्पादनासारखे नाही, त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक झाली. बी-बियाणे निर्माण करण्यासाठी जितकी शेती घेतली असेल तेवढ्या भागातच त्याची उगवण होणार आहे. परंतु आपण क्षमता न वाढता हव्याने बुकींग घेतले. त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक झाली. यातून बियाण्यांचा काळाबाजार झाला आणि बोगस बियाणे बाजारात आले. तेव्हा या संदर्भातील धोरणात्मक भूमिका शासनाला घ्यावी लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

सभापती महोदय, जोपर्यंत शेतकरी नगदी पिके घेत नाहीत, तोपर्यंत त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होणार नाही. ज्वारी -बाजरी सारखी पिके घेऊन त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारणार नाही. तरीही शेतकरी ही पिके घेत आहेत. माझ्याकडे राष्ट्रीय पाहणीचा अहवाल आहे. त्यामध्ये महाराष्ट्र, गुजरात आणि तामिळनाडू राज्यांची तुलना केलेली आहे. महाराष्ट्रात 75 टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. गुजरात राज्यामध्ये ही टक्केवारी 56 आहे तर तामिळनाडूमध्ये 70 टक्के आहे. महाराष्ट्रामध्ये कृषी क्षेत्रफळ 56 टक्के आहे, गुजरातमध्ये 47 टक्के तर तामिळनाडू राज्यामध्ये 40 टक्के आहे. या तिन्ही राज्यांतील लोकसंख्या विषम आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या 11 कोटी आहे, गुजरात राज्याची 5 कोटी आहे तर तामिळनाडू राज्याची 6 कोटी आहे.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्या तुलनेने आपण ही टक्केवारी पाहिली तर महाराष्ट्र कृषी क्षेत्रामध्ये कसा मागे पडत चालला आहे हे आपल्याला स्पष्ट दिसते. लँड होल्डींग म्हणजे प्रत्येक शेतकऱ्याकडे शेती धारण करण्याची क्षमता असते. आज दुर्दैवाने महाराष्ट्रामध्ये वहितीखालील 46.6 टक्के खातेदाराकडे फक्त एक हेक्टर शेती आहे, म्हणजे तो अल्पभूधारक आहे. गुजरातमध्ये 34 टक्के आहे आणि तामिळनाडूमध्ये 76 टक्के वहितीखालील क्षेत्र आहे. हे सर्व करीत असतांना पीक पध्दतीमध्ये म्हणजे ज्वारी, बाजरी हे सर्व अन्न धान्य पिकविले जाते त्यामध्ये आपण आघाडीवर आहोत. आपण 61 टक्के पिकवितो, गुजरात 40 टक्के पिकवितो आणि उर्वरित लागणारे धान्य ते बाहेरुन आणतात, तामिळनाडू 54 टक्के पिकवितो.

सभापती महोदय, तेलबियांचे पीक हे महत्वाचे पीक आहे. आदरणीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी तेलबियांच्या उत्पादनाचे धोरण जाहीर केले, ते अंमलात आणले की नाही मला माहीत नाही. सभापती महोदय, परदेशामधून सर्वात जास्त आयात काय करावे लागत असेल तर तेल आयात करावे लागत आहे. त्यामध्ये आपल्याला प्रचंड परकीय चलन द्यावे लागत आहे. आपल्याकडे तेलबियांचे उत्पादन कमी असल्यामुळे तेलाची निर्मिती कमी व मागणी जास्त आहे. या बाबतीत गुजरात राज्य आघाडीवर आहे. तेलबिया हे नगदी पैसे देणारे पीक आहे, त्याचे उत्पादन वाढविले तर आपली आर्थिक क्षमता वाढेल हे तेथील शेतकऱ्याला समजले आहे. या मुळे इतर राज्यांच्या तुलनेत तेल बियांच्या उत्पादनामध्ये आपण फक्त 10 टक्के आहोत, गुजरातमध्ये 27 टक्के उत्पादन आहे व तामिळनाडूमध्ये 17 टक्के उत्पादन आहे. ज्या पिकामध्ये आपल्याला नगद पैसे मिळू शकतात ते उत्पादन घेण्यामध्ये आपण मागे पडलो आहोत. आपल्याकडे आपण ज्याला नगदी पीक म्हणतो त्यामध्ये तूर, मूग, हरभरा ही पिके येतात. त्यामध्ये सुध्दा गुजरात राज्य पहिल्या क्रमांकावर असून तेथील उत्पादन 25 टक्के आहे आणि आपले फक्त 21 टक्के उत्पादन आहे. याचा सरळ अर्थ असा की, शेतकऱ्यांमध्ये आर्थिक क्षमता निर्माण करणारे पीक घेण्यासाठी आवश्यक असलेल्या कृषी धोरणामधील कमतरता आपण वाढविणार आहोत काय? मी आपल्याला सुरुवातीला आत्महत्त्या कां वाढत आहेत हे सांगितले. याचे कारण हेच आहे की, आपण या बाबतीत आपली कृषी क्षमता जोपर्यंत वाढवीत नाही तोपर्यंत शेतकऱ्याच्या दृष्टीने समृध्द नाही परंतु समाधानकारक आर्थिक व्यवस्था निर्माण होणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, सिंचन क्षमतेच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर अत्यंत दुर्दैवी परिस्थिती आहे याचे मला वाईट वाटते. मी या सभागृहामध्ये सिंचनाच्या अनुशेषाच्या प्रश्नावर अनेक पध्दतीने आणि अनेक वेळा बोललो आहे. सिंचनाच्या अनुशेषाचा विषय हा महाराष्ट्राच्या विधानपरिषदेचा महत्वाचा विषय ठरलेला आहे. सन्माननीय प्रा. बी.टी. देशमुख साहेब हे आज या सभागृहामध्ये नाहीत. सिंचन क्षेत्रातील महाराष्ट्राची सिंचन क्षमता फक्त 22.03 टक्के आहे, गुजरातची 28.76 टक्के आहे आणि तामिळनाडूची 57.54 टक्के आहे. मी या संदर्भातील आकडेवारी सदनामध्ये मांडली होती. ज्यावेळी कृष्णा खोरे आयोगाचा निर्णय आला त्यावेळी आपल्याला सर्वात कमी वाटा मिळाला,तो कां मिळाला? त्यावेळी आमची टिंगल टवाळी करण्यात आली. सन 2000 सालापर्यंत आपण कृष्णा खोरेचे पाणी अडविले नाही तर पाणी लवादामध्ये आपल्याला मोठा फटका बसेल. हे जाणून त्यावेळी शिवशाही सरकारने कृष्णा खोरेमधील पाणी अडविण्याकरिता कर्ज काढून कां होईना धरणे बांधली आणि 80 टक्के पाणी साठा निर्माण केला हे मी अधिकृतरित्या बोलत आहे. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप हे सारखे सारखे युती सरकारने कर्ज काढले असा उल्लेख करतात म्हणून मी त्यांना हे सांगत आहे. ते पाणी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही थांबलो नाही, थांबू शकलो नाही म्हणून आम्हाला लोकांनी घरी पाठविले आणि तुम्हाला आणून बसविले. याचा परिणाम असा झाला की, गेल्या दहा-बारा वर्षात या राज्याचा कर्जाचा डोंगर सव्वा 2 लाख कोटींवर गेला तरीही कृष्णा खोऱ्यातील प्रकल्प आहेत तिथेच जैसे थे आहेत अशी परिस्थिती निर्माण झाली. याचा परिणाम असा झाला की, कृष्णा खोऱ्यातील पाण्याच्या बाबतीत कर्नाटक राज्याने उपलब्ध पाण्याच्या दीड पटीने कामे करुन ठेवली आहेत. म्हणजे आज त्यांना पाणी मिळाले नाही, परंतु भविष्यात अमुक इतके टीएमसी मिळणारे पाणी साठविण्याची व्यवस्था आधीच करुन ठेवली आहे. त्याचप्रमाणे तामिळनाडू सरकारने सुध्दा एक पाऊल पुढे टाकून काम करुन ठेवले आहे याची माहिती सन्माननीय मंत्री श्री. मधुकरराव चव्हाण साहेबांना आहे.त्याचे फटके मराठवाडातील जनता खात आहे.

सन्माननीय मंत्री श्री. अजित पवार साहेबांनी सिंचन मंत्री या नात्याने कृष्णा खोरेमधील 10 टक्के पाणी तुम्हाला मिळणार नाही असे सांगितले. "आम्ही हे पाणी देणार नाही" अशा शब्दामध्ये ते या ठिकाणी उभे राहून बोलले. त्यानंतर सन्माननीय मुख्यमत्र्यांच्या बंगल्यावर भानगड झाली, त्या वेळी पश्चिम महाराष्ट्रातील आमदारांनी एक मोठे टेबल उलथवून टाकले. त्यावेळी सन्माननीय मंत्री श्री. चव्हाण साहेब आपणही त्या ठिकाणी होता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, कृष्णा खोऱ्यातील 10 टक्के पाणी आपण आम्हाला कधी देणार? कृष्णा-भीमा खोऱ्यातील 1200 कोटींचे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर 80 कि.मी.च्या टनेलमधून वेगाने पाणी येणार आहे, ते बारामतीमध्ये जाणार आणि 200 नवीन ऊस कारखाने निर्माण होणार एवढी क्षमता त्या प्रकल्पामध्ये आहे. परंतु बाकीच्या पश्चिम महाराष्ट्राला पाणी नाही. पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली जिल्ह्यातील पाच तालुके अजूनही उजाड आहेत हे त्या भागातील आमदार आपल्याला सांगतील. त्या भागामध्ये पाऊस नाही, कडक ऊन पडलेले असते. परंतु तालुक्यातील जमिनी खालून टनेलव्दारे पाणी जात आहे. आमच्या जमिनी खालून पाणी जात आहे आणि वर आमची जमीन कोरडी आहे या मुळे ते लोक हैराण झाले आहेत. अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्र सिंचन क्षमतेमध्ये मागे पडला आहे तर मग आपण शेतकऱ्यांना कोणता दिलासा देणार आहात हा प्रश्न निर्माण झाला आहे? मराठवाड्याला 10 टक्के पाणी कधी मिळेल हे सांगता येत नाही ही परिस्थिती आहे. त्यासाठी आपण लढत आहोत, पाणी असेपर्यंत लढतच राहणार, नवीन येतील ते सुध्दा लढत राहतील, ही लढाई पुढील पिढीपर्यंत राहील परंतु पाणी मिळणार नाही.

सभापती महोदय, इतर तीन राज्यांच्या तुलनेत उत्पादन क्षमतेच्या बाबतीत आपली अवस्था दुर्दैवी आहे. ज्या अहवालामध्ये ही माहिती देण्यात आली आहे तो राष्ट्रीय अहवाल आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत गुजरातची 50 टक्के लोकसंख्या आहे, तामिळनाडूची लोकसंख्या आपल्यापेक्षा कमी आहे म्हणजे 6 कोटी आहे आणि आपली 11 कोटी लोकसंख्या आहे. उत्पन्न क्षमतेमध्ये महाराष्ट्र 1167 मे.टन प्रति हेक्टरी उत्पन्न निर्माण करीत आहे आणि आपली सिंचन क्षमता फक्त 16.4 टक्के आहे. गुजरातमध्ये 1717 मे.टन उत्पन्न आहे आणि सिंचन क्षमता 91.5 टक्के आहे. त्याही पुढे जावून तामिळनाडूमध्ये 1542 मे. टन उत्पन्न म्हणजे आपल्या पेक्षा जास्त असून सिंचन क्षमता 100 टक्के आहे. त्या राज्यांना एवढे समजले आहे की, शेती नंतर होईल परंतु पाणी पहिले अडविले पाहिजे. त्या राज्यांनी भविष्यात मिळणाऱ्या पाण्याकरिता आपल्या अर्थसंकल्पामधील पैसे ओतून हे प्रकल्प उभे केले आहेत आणि आपण आपल्याकडे असलेले पाणी थांबवू शकत नाही. ही परिस्थिती निर्माण झाल्यामुळे आपण शेती क्षेत्रामध्ये मागे राहिलो आहोत. शेती उत्पादनाच्या बाबतीत आपली अत्यंत केविलवाणी परिस्थिती निर्माण झाली आहे. सन्माननीय मंत्री श्री. चव्हाण आपण शेती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

क्षेत्रातील आहात म्हणून मी हे आपणासमोर कां मांडीत आहे.या ठिकाणी वेगवेगळया पध्दतीने शेतीच्या प्रश्नामध्ये मोठया अपेक्षेने मांडीत आहे. यामध्ये टीकेचा भाग असू शकतो, त्यावर मला पाहिजे तशी मी टीका सुध्दा करीन. सन 2008-09 च्या अहवालामध्ये राज्याच्या शेती उत्पन्नाचे प्रमाण दिले आहे. त्यामध्ये महाराष्ट्राचे प्रमाण 10.78 असून मागील उत्पन्नापेक्षा ऊणे 8.30 आहे, गुजरातचे 15 आहे, मागील उत्पन्नापेक्षा ऊणे 1.6 आहे आणि आज जवळ जवळ त्या पातळीवर आले आहेत. तामिळनाडूचे उत्पन्न 12.2 असून मागील उत्पन्नाच्या ऊणे 1.48 आहे. हे सर्व शेती क्षेत्रामध्ये आकांड तांडव चालू असतांना आपण आपले पाऊल पुढे टाकलेले दिसत नाही ही शोकांतिका मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे. मी या ठिकाणी आपले मनापासून अभिनंदन केले.

सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी खरिपाची आढावा बैठक संभाजीनगरला घेतली, त्यावेळी आपण त्या ठिकाणी होता. त्यांनी विदर्भामध्ये बैठक कां घेतली नाही? विदर्भामध्ये उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्याला दिलासा देण्यासाठी खरिपाची आढावा बैठक झाली पाहिजे ती कां झाली नाही याचे उत्तर मला सापडले नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मघाशी सोयाबीनच्या शेतीचा उल्लेख केला. मी सर्व ठिक्राणी जावून आलो आहे, शेतकऱ्यांना भेटून आलो आहे, मी उगीच जाहिरात बाजी करीत नाही, कॅमेरा घेऊन फिरत नाही. उद्ध्वस्त लोकांना दाखविण्यापेक्षा आमदार म्हणून लोकांची उद्ध्वस्तता थांबविण्याच्या भावनेमधून मी करतो. मला जेव्हा जेव्हा वेळ मिळतो तेव्हा शनिवारी-रविवारी सुध्दा त्या ठिक्राणी जातो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

सभापती महोदय, बोगस बी-बियाणाबद्दल बातम्या आल्या आहेत. मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, बोगस बी-बियाणाच्या बाबतीत ज्यांना पकडले आहे, त्यांच्या बाबतीत कोणती कारवाई झाली, त्यांच्यावर गुन्हे नोंदविले गेले आहेत काय आणि तसे असेल तर त्याबाबतीत पुढे काय झाले? याबाबतीत कृपा करुन आपण आम्हाला नागपूरच्या अधिवेशनामध्ये सांगावे. कारण माझा अनुभव आहे की, बी-बियाणे आणि फवारणीसाठी वापरण्यात येणारी औषधे ही बोगस असल्याचे आढळून आल्यानंतर देखील आपल्या किचकट प्रक्रियेमुळे तीन-तीन वर्षे गुन्हेच दाखल होत नाहीत. ही औषधे तपासणीसाठी या लॅबमध्ये पाठवितात, त्या लॅबमध्ये पाठवितात. तसेच काही वेळेला दिल्लीतील लॅबमध्ये अडचण आली तर महाराष्ट्रातील लॅबमध्ये पाठवितात आणि महाराष्ट्राच्या लॅबमध्ये अडचण आली तर दिल्लीच्या लॅबमध्ये तपासणीसाठी पाठवितात. यापैकी कोणत्याही एका लॅबचा अहवाल बरोबर असेल तर संबंधित सुटून जातात. परंतु प्रत्यक्षात शेतकरी मात्र उद्ध्वस्त झालेला असतो.त्यामुळे शासन ही पध्दत बदलणार आहे की नाही हा प्रश्न आहे. याबाबतीत कोणाला शासनच होत नाही.या राज्यातील एकही कायदा असा नाही की ज्यांनी बियाणांच्या बाबतीत बदमाशी केलेली आहे, त्यांना आपण तुरुंगामध्ये टाकू शकतो.गेल्या 50 वर्षा-मध्ये आपण अशा प्रकारे बोगस बी-बियाणांचा पुरवठा करणाऱ्यांना आणि पंजाब-हरियाणा आणि तामिळनाडू मधून फवारणीसाठी पुरविण्यात येणाऱ्या बोगस औषधांसाठी आपण आतापर्यंत कोणालाही तुरुंगात टाकू शकलो नाही ही दुर्दैवी बाब आहे.त्यामुळे महाराष्ट्र हे शेतकऱ्यांसाठी कसे आहे, यापेक्षाही शेतकऱ्यांच्या घरामधून आपले उत्पन्न काढण्याची क्षमता असलेल्या कंपन्यांकरता महाराष्ट्र हा सुपीक प्रांत आहे. आपल्याकडे कोणालाही शासन होतच नाही अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, या राज्यामध्ये वेळेवर पाऊस पडला नाही, एका महिना पुढे गेला. मी शनिवार-रविवार कापूस संशोधकांबरोबर बैठक घेतली. माझा प्रश्न एवढाच होता की, काही हुशार शेतकऱ्यांनी ठरविले की, पाऊस पडलेला नसल्याने आता पेरा करु नये. श्री.सतीश चव्हाणसाहेब यांना सांगू इच्छितो की, मी काल मराठवाड्यामध्ये होतो. त्याठिकाणी बी.टी.कॉटनचा एक महिना उशीरा पेरा करण्यात आला आणि त्याचे पीक दीड ते पावणेदोन फूट ऊंच असावयास पाहिजे ते आता चार इंच होते. म्हणून मी संबंधितांना सांगितले की, याला उशिरा झाल्यामुळे पीक देखील एक महिना उशीरा येणार आहे.त्यावर मला असे सांगण्यात आले की,यामध्ये घसारा येणारच, उत्पन्नामध्ये घट येणारच आहे. मी या बाबतीत नुकसान भरपाई द्यावी असे सांगणार नाही.परंतु ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

शासन बी.टी.कॉटनच्या बाबतीत नक्की काय करणार आहे? मला बी-बियाणांच्या संदर्भात खूप बोलावयाचे होते, काही सूचना करावयाच्या होत्या. या अनुषंगाने मी जो काही अभ्यास केला होता, त्याबाबत सांगावयाचे होते.तसेच याबाबतीत कृषी विभागाच्या माध्यमातून यावर योग्य प्रकारे नियंत्रण आणावे यादृष्टीने माझा प्रयत्न होता.पण जे विधेयक मी पाच-सहा अधिवेशनापासून थांबविले होते,ते विधेयक माझे निलंबन करण्यात आल्यानंतर तुम्ही एका मिनिटांमध्ये मंजूर केले. माझे असे म्हणणे होते की,याबाबतीत चर्चा व्हावयास पाहिजे, पण ते एका मिनिटांमध्ये मंजूर केले. ठीक आहे.कायदा पास झाला.परंतु शेतकऱ्यांची उद्ध्वस्ता थांबविण्यासाठी ज्या काही सूचना करावयाच्या होत्या,त्या मात्र करता आल्या नाहीत.अशा वेळी मी आपल्या कृतीचा निषेध का करु नये असा प्रश्न आहे.त्यामुळे मला खूप दु:ख झाले.त्यामुळे पिकाचे उत्पादन एक महिना पुढे गेल्यामुळे शेतकरी अडचणीमध्ये आलेला आहे.

सभापती महोदय,पिकावरील बोंड अळीचा प्रादूर्भाव थांबलेला आहे परंतु इतर रोगांचे प्रमाण वाढलेले आहे.औषध फवारणीचा खर्च वाढला.विदर्भ-मराठवाड्यामध्ये 2005 मध्ये फवारणीच्या औषधांसाठी 200 कोटी रुपये म्हणजे मराठवाड्यासाठी 80 कोटी रुपये आणि विदर्भासाठी 120 कोटी रुपये खर्च होत होते.आता तो खर्च पावणे तीनशे कोटी रुपयांवर गेलेला आहे.शेतकरी फवारणीसाठी आपल्या खिशातून नगद पावणे तीनशे कोटी रुपये देतो.परंतु त्याला पाहिजे तसे उत्पन्न मिळत नाही.मध्यवर्ती बँकेने पीक कर्ज वाटप कसे केले आहे? शिखर बँकेच्या बाबतीत सांगावयाचे तर तेथे सर्व बरखास्त केले असून आता श्री.गोयल साहेब तेथे गेले आहेत. मला खात्री आहे की,आता ते तेथील सर्व बाबी खणून काढतील आणि त्यांनी त्यांच्या स्वभावाप्रमाणे ते खणून काढावे अशी अपेक्षा आहे आणि त्याठिकाणी जे काही पाप घडले आहे ते बाहेर येईल, भयानक पाप घडले आहे आणि त्यातून बऱ्याच काही गोष्टी बाहेर येतील आणि नागपूर अधिवेशनाच्या वेळी शासनाला याला सामोरे जावे लागेल हे मी आजच सांगून ठेवतो.पण ते पध्दतीशीरपणे मांडता आले पाहिजे यासाठी अभ्यास सुरु आहे.तसेच नाबार्डच्या जाचक अटीमुळे शेतकऱ्यांच्या कर्जाचे पैसे रोखले गेले आहेत. शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध होत नाही.याठिकाणी माननीय सहकार मंत्री देखील हवे होते.याबाबतीत मी शेतकऱ्यांशी बोललो आहे.शासन शेतकऱ्यांसाठी काही करणार आहे की नाही? या बाबतीत नाबार्डच्या अधिकाऱ्यांना याबाबत चर्चा करण्यासाठी बोलविणार आहात की नाही? कारण शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज मिळाले तर त्याचा उपयोग आहे, पण ते मिळतच नाही .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशी अवस्था आहे.

सभापती महोदय, हमी भावाच्या बाबतीत सांगावयाचे तर कापसाच्या हमी भावाच्या बाबतीत परिस्थिती गंभीर होणार आहे. गेल्या वेळेला पाकिस्तान पावसामुळे उद्ध्वस्त झाला,चीन उद्ध्वस्त झाला आणि अमेरिकेने कापसाच्या पेऱ्यामध्ये बदल करुन मक्याची पेरणी सुरु केली.कारण ते कापसाला भारतीय रुपयानुसार पर एकरी 1500 रुपये सबसिडी देत होते.पण त्यांनी आता मक्याचे पीक घेण्याचे ठरविल्यामुळे गेल्या वर्षी कापसाच्या बाबतीत मोठी चणचण निर्माण झाली.या जागतिक बदलामुळे आपल्याकडे एकाएकी भाव वाढून शेतकऱ्याला 6500 रुपयापर्यंत भाव मिळाला. अनेक व्यापाऱ्यांनी भविष्यामध्ये आणखी भाव मिळेल या लालसेपोटी कापसाच्या 5 लाख गाठी घेतल्या आणि आता त्या व्यापाऱ्यांकडे पडून आहेत.त्यामुळे आतापर्यंत फक्त शेतकरीच उद्ध्वस्त होत होता, परंतु आता व्यापाऱ्यांवर आत्महत्या करण्याची पाळी आलेली आहे. कारण त्यांनी बँकेचे कर्ज घेतलेले आहे. माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेबांनी आता निर्यातीची मर्यादा नुकतीच आठ दिवसापूर्वी पंचवीस लाख गाठीपर्यंत वाढविल्यामुळे कुठेतरी हा बाजार थांबेल आणि व्यापारी उद्ध्वस्त झाला असला तरी काही प्रमाणात तरु शकेल.व्यापाऱ्यांनी सहा हजार रुपयांना घेतलेला कापूस त्यांना साडेतीन, चार हजार रुपयाने विकावा लागेल. पण तो उद्ध्वस्त होणार नाही. आता शेतकऱ्यांना सहा हजार रुपयांची लालूच लागलेली आहे.परंतु आता त्याला यावर्षी तीन हजार रुपये तरी भाव मिळेल की नाही अशी शंका निर्माण झालेली आहे.त्याबाबतीत शासन कोणते धोरण घेणार आहे.

सभापती महोदय, कापूस एकाधिकार खरेदी योजना ही शेतकऱ्यांसाठी आदर्श होती, कापूस उत्पादकांसाठी ते सन्मानाचे स्थान होते,ते उद्ध्वस्त करुन व्यापाऱ्यांच्या हातामध्ये देऊन टाकलेले आहे.त्यामुळे शेतकरी उद्ध्वस्त होत आहे.त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्याला भविष्यामध्ये अडचण येणार आहे. तसेच ऊस उत्पादकाच्या बाबतीत सांगावयाचे तर हमी भावाच्या विषयी शिखर बँकेच्या अधिकाऱ्यांनी जाहीर केले आहे की,आम्ही आता हमी भाव देऊ शकत नाही. त्यामुळे यावर्षी ऊस उत्पादक शेतकरी देखील अडचणी मध्ये येणार आहे. पण ऊस उत्पादक हा यांचा आहे आणि त्याच्यासाठी ते सरकारच्या तिजोरीतून पैसे देऊन, त्यांना तारुन नेतील. परंतु कापूस उत्पादकाला तसे मिळत नाही. शेवटी मला माननीय मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे की,आपल्या नेतृत्वाखाली चांगले धडाडीचे काम सुरु आहे, जाणिवेतून चालले आहे याबद्दल आनंद व्यक्त करीत असताना,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मी याठिकाणी शेतकऱ्यांच्या उद्ध्वस्तेबद्दल मुद्दा मांडलेले आहे, त्याबाबत आपण धोरणात्मक काही निर्णय घ्याल अशी अपेक्षा व्यक्त करतो. शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईच्या संबंधात तातडीने कोणती पावले उचलणार आहात ? याबाबतीत माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब यांनी मुद्दे मांडलेले आहेत. तसेच आपण याबाबतीत 450 किंवा 451 अधिकाऱ्यांपैकी केवळ 44 अधिकारी निलंबित केले आहेत. मग बाकीच्या अधिकाऱ्यांबाबत काय करणार आहात?तसेच निलंबनाचा कालावधी सहा महिन्याचा असतो.त्या नंतर ते परत कामावर येतात. त्यामुळे याबाबतीत निश्चितपणे निर्णय घेण्यात यावा. राज्य पॅकेजच्या बाबतीत उध्वस्थता निर्माण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत सांगावयाचे तर जे नालायक अधिकारी आहेत, ज्यांनी हे पॅकेज खाऊन टाकले आणि शेतकऱ्यांच्या टाळूवरचे लोणी खाऊन सरकारला देखील फसविले, शेतकऱ्यालाही फसविले आणि त्यातून विधीमंडळाचा अवमान केलेला आहे,ज्याच्यावर आपण चर्चा केली.त्या अधिकाऱ्यांना तुरुंगामध्ये पाठविणार आहात की नाही आणि एकंदर किती जणांना तुरुंगामध्ये पाठविण्याची तयारी केलेली आहे? याचा देखील अहवाल पुढच्या अधिवेशनामध्ये मिळाला पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद. जय हिंद जय महाराष्ट्र.

. . . .एफ-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, शेती आणि शेतकरी हा विषय महाराष्ट्राच्या दृष्टीने जीवंत आणि ज्वलंत आहे. महाराष्ट्र राज्याचे माननीय कृषी मंत्री हे तडफदार

आणि सौम्य प्रकृतीचे आहेत. माझी अपेक्षा आहे की, महाराष्ट्रातील शेतकरी जीवंत ठेवण्यासाठी अतिशय संवेदनाक्षम भावनेने महाराष्ट्र शासनाने पावले टाकावीत अशी मी प्रथमत: आग्रहाची विनंती करतो. महाराष्ट्रामध्ये असंख्य शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. मृत्यूला कवटाळत इहलोकाची यात्रा संपविली. महाराष्ट्रातील हजारो शेतकरी अनंताच्या प्रवासाला निघून गेले आणि हे दुर्दैवी चित्र संपूर्ण महाराष्ट्र उघड्या डोळयांनी पहात आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ....

महाराष्ट्रातील शेती निसर्गावर अवलंबून आहे. परंतु निसर्गाच्या दुष्टचक्रामुळे महाराष्ट्रातील शेतकरी भरडला जात आहे. या शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी राज्य शासनाने ठोस पावले टाकली तरच शेतकरी जिवंत राहणार आहे. शेती करण्याचा मोह अनेक तत्वज्ञानी व्यक्तींना झालेला आहे. श्रीकृष्णाने स्वत: शेतीमध्ये लक्ष घातले. सांदीपनी ऋषीच्या आश्रमात त्यांनी मोळ्या वाहण्याचे काम केले. तत्वज्ञानी लोकांना शेतीचा मोह पडलेला आहे. व्यास, वाल्मिकी सारख्या ऋषींनी स्वत:च्या शेतीमध्ये तांदूळ पिकविला. शेती करुन स्वत:चा आश्रम चालविला. टॉलस्टॉय सारखा तत्ववेत्ता स्वत:च्या शेतीमध्ये राबत होता. त्या शेतीमधून समाजनिर्मिती आणि राष्ट्रनिर्मिती घडवू ही त्यांची अपेक्षा होती आणि त्या दृष्टीने सर्व प्रयत्नांना चालना देण्याचा प्रयत्न या सर्व तत्ववेत्त्यांनी केलेला आहे. डार्विनने उत्क्रांतवादाचा सिध्दांत मांडला. परंतु पहिला जीव कसा निर्माण झाला हे तो सांगू शकला नाही. सिंधू नदीच्या काठावर आर्य आले, शेती केली, तांदूळ पिकविला. जगाच्या पाठीवर समृध्द शेतकरी म्हणून सिंधू नदीच्या काठावरील आर्यांचा उल्लेख करावा लागेल. तशा ऐतिहासिक नोंदी सापडतात. परंतु पहिली शेती कोणी केली हे अजूनही सांगता येऊ शकत नाही.

सभापती महोदय, गोदावरीचे खोरे, कृष्णेचे खोरे अतिशय संपन्न आहे, समृध्द आहे. पाश्चात्य राष्ट्रामध्ये नाईल नदीचे खोरे अतिशय समृध्द आहे. आता नाईल नदीच्या खोऱ्यामध्ये विविध रंगाचा कापूस घेतला जातो. त्या ठिकाणी रंगीबेरंगी कापूस पिकवितात. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना सांगू इच्छितो की, दुनिया और रंगीन दिखायी देगी. आमच्या माननीय कृषी मंत्र्यांनी जर हा प्रयोग महाराष्ट्रामध्ये केला आणि महाराष्ट्रामध्ये विविध रंगाचा कापूस निर्माण झाला तर निश्चितपणे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आयुष्यामध्ये इंद्रधनुष्य फुलू शकते. खांद्यावर कुदळ घेतलेला शेतकरी हे शेतकऱ्यांचे प्रतीक आहे.

एक दृष्टांत किंवा कथा सांगण्याचा मोह मला या ठिकाणी होतो. एका निवृत्त झालेल्या साहेबांना असा मोह होतो की, आता आपण शेती घेतली पाहिजे. निवृत्तीनंतर रक्कम हातामध्ये पडते आणि आता काय करावे हे कळत नाही. साहेबांचे सगळे आयुष्य नोकरीमध्ये गेलेले असते. बराच पैसा मिळालेला असतो. त्या पैशाचा उपयोग कसा करावा हे कळत नाही त्यामुळे काही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ....

शेतकऱ्यांच्या आग्रहास्तव साहेब शेती घेतात. बँकेकडे जाऊन कर्ज घेतात आणि पेरा करतात. थोडाफार पाऊस पडतो. पीक वर येते. साहेब आनंदी होतात. मारुतीच्या पारावर सर्व गावाची बैठक होते. मग शेतकरी सांगतात, काळ्या आईचे देणे आहे, सोनच सोने आहे. साहेब, तुम्ही चिंता करु नका, या वर्षी तुमच्या पदरामध्ये मोत्याचे दाणे पडणार आहेत, तुम्ही निश्चिंत राहा. साहेबांच्या दुर्दैवाने त्या वर्षी जोरदार पावसाला सुरुवात होते आणि अतिवृष्टीमुळे सगळे पीक मातीमोल होते. साहेब डोक्याला हात लावतात. पुन्हा एकदा सगळे गावकरी बसतात. मग साहेबांना सल्ला देतात, चिंता करु नका. काळ्या आईचे देणे आहे, शेवटी सोनेच सोने आहे. या वर्षी नाही तर पुढच्या वर्षी तुमच्या हातामध्ये मोत्याचे दाणे पडल्याशिवाय राहणार नाहीत. पुन्हा साहेब डी.सी.सी. बँकेकडे जातात, कर्ज काढतात, पेरा करतात आणि साहेबाच्या दुर्दैवाने त्या वर्षी एक थेंबही पाऊस पडत नाही. कोरडा दुष्काळ पडतो. मग पुन्हा गावकऱ्यांची बैठक होते. पुन्हा तोच सल्ला साहेबांना दिला जातो. तिसऱ्या वर्षी साहेब अतिशय निर्विकारपणे विचार करतात. या वर्षी काही तरी करु, बँकेच्या माध्यमातून घेतलेल्या कर्जाचा परिणाम म्हणून शेवटी शेतामध्ये पीक येईल, आपल्या पदरात पडेल आणि त्याचा नक्की फायदा झाल्याशिवाय राहणार नाही, नोकरीच्या काळामध्ये जेवढी रक्कम आपण मिळविली होती त्याहीपेक्षा दुप्पट रक्कम ही काळी आई आपल्याला दिल्याशिवाय राहणार नाही, ही त्याची भावना असते. मग साहेबाच्या सुदैवाने प्रथमत: बऱ्यापैकी पाऊस पडतो. शेतीतले धान्य पोटाऱ्यामध्ये येते. कणसे निसवतात आणि थोडेफार दाणे दिसू लागतात. त्याच वेळेस एका रात्रीमध्ये एवढी गारपीट होते की, त्या शेतीतील सर्व पीक मातीमोल होते. साहेबांच्या हातामध्ये एक दाणाही पडत नाही. आता साहेबांना वैफल्य येते, निराशा येते. काय करावे हे कळत नाही. ते निराशेपोटी अंगावरची सर्व वस्त्रे काढतात, एक लंगोट लावतात आणि आपण हिमालयाच्या दिशेने जावयास पाहिजे या भावनेने बाहेर पडतात. नदीच्या पलीकडे गेल्यानंतर समोरुन नग्न साधू येत असताना ते पाहतात. जवळ जातात आणि दचकून मागे वळून पळू लागतात. ते संन्यासी विचारतात, अरे काय झाले ? साहेब म्हणतात, अहो, मी पाच एकर शेती घेतली तर लंगोट आला, तुम्ही किती घेतली असेल ? असे म्हणून तो पळत सुटतो. तात्पर्य हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ....

आहे की, शेतीचा धंदा हा आतबट्टयाचा आहे.

गेल्या अनेक वर्षापासून शेतकरी उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. शेतकरी दिवाळखोरीच्या कड्यावर उभा आहे. अशा शेतकऱ्याला वाचविण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलली नाहीत तर शेतकरी जगू शकणार नाहीत, अशी परिस्थिती आहे. माझी माननीय कृषी मंत्र्यांना विनंती आहे की, आपण कायम स्वरुपी शेतकरी अन्नदाता निधी उभा करावा. ज्याप्रमाणे आपण रोजगार हमी योजनेचा निधी उभा केला त्याप्रमाणे शेतकरी अन्नदाता निधी उभा करावा. दुष्काळ पडला, अतिवृष्टी झाली, गारपीट झाली, आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली तर या शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, शेतकऱ्यांना शासनाच्या वतीने मदत होईल म्हणून राज्य शासनाने शेतकरी अन्नदाता निधी अशा प्रकारचा एक निधी उभा करावा, अशी मी आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, स्व. यशवंतराव चव्हाण असे म्हणाले होते की, शेती हा शंभर तोंडाचा राक्षस आहे आणि शेतकऱ्याला गिळंकृत करण्याची क्षमता या राक्षसाच्या तोंडात आणि अंगात आहे. त्यामुळे हा राक्षस मारला पाहिजे, काही तरी उपाययोजना केली पाहिजे. स्व. यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्राचे द्रष्टे पुरुष यांची जी भावना होती तीच भावना आमच्या कृषी मंत्र्यांची आहे असे समजण्यास हरकत नसावी. ते उपाययोजना करतील अशी अपेक्षा बाळगली तर ती अनाठायी, अप्रस्तुत, अवास्तव ठरु नये, अशी अपेक्षा मी या क्षणी व्यक्त करतो. कर्मचाऱ्यांसाठी आतापर्यंत सहा वेतन आयोग नियुक्त करण्यात आले. शेतकऱ्यांसाठी डॉ. स्वामीनाथन आयोग नेमण्यात आला. स्वातंत्र्यानंतर आतापर्यंत शेतकऱ्यांसाठी फक्त एक आयोग नेमण्यात आलेला आहे. कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सहा आयोगांच्या सर्व शिफारशी केंद्रातील कर्मचाऱ्यांना, महाराष्ट्रातील कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आल्या. परंतु डॉ. स्वामीनाथन आयोगाच्या ज्या सूचना आहेत, ज्या शिफारशी आहेत त्यापैकी किती शिफारशी आपण स्वीकारल्या ? त्यांनी असे सांगितले होते की, आयात करण्यात येणाऱ्या वस्तूंवर 70 टक्के आयात कर लावण्यात यावा. त्याप्रमाणे राज्य शासनाने आयात कर लावला का, केंद्र शासनाने आयात कर लावला का ? राज्य सरकारने आग्रह धरला का ? हे आपण एकदा जाहीर करण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ....

सभापती महोदय, अर्थसंकल्प तयार करण्यापूर्वी केंद्र शासन देशातील सर्व व्यापाऱ्यांची परिषद घेते. व्यापाऱ्यांसमोर काय अडीअडचणी आहेत हे समजून घेते. ही चांगली गोष्ट आहे. आमची अशी विनंती आहे की, अर्थसंकल्प तयार करण्यापूर्वी महाराष्ट्रातील आणि देशातील शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींबरोबर आपण चर्चा केली पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

त्यांचे प्रश्न समजून घेतले पाहिजेत. ते प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने आवश्यक आहेत, शासन तसे प्रयत्न करणार आहे काय ? माझी राज्य शासनाला विनंती आहे की, प्राथमिक शिक्षणामध्ये कृषी शिक्षणाचा अंतर्भाव करावा. ग्रामीण मुलांवर लहान वयातच कृषी संस्कार झाला तर महाराष्ट्रातील मुली भविष्यात असे म्हणू शकतील की, मला शेतकरी नवरा पाहिजे. ज्यावेळी या महाराष्ट्रातील मुली आम्हाला शेतकरी नवरा पाहिजे असे म्हणतील त्यावेळी महाराष्ट्रातील शेतकरी समृध्द झालेला असेल असे मानावयास हरकत नाही. महाराष्ट्रामध्ये 72 लाख हेक्टर जमीन नापिक आहे. त्यापैकी 31.06 लाख हेक्टर शासनाची आहे. मग 72 लाख हेक्टर जमीन पिकाखाली आणण्यासाठी शासनाने नियोजन केले आहे काय ? यासंबंधी माननीय कृषी मंत्र्यांनी धोरणात्मक घोषणा सभागृहात करावी अशी मी आग्रहाची विनंती करणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी राज्यात 22 टक्के सिंचन झाल्याचे म्हटले आहे. परंतु माझ्याकडे पाटबंधारे लाभक्षेत्र विकास अभ्यास गटाचा अहवाल आहे. त्या अहवालानुसार राज्यात फक्त 16 टक्के सिंचन झाल्याचे नमूद केलेले आहे. राष्ट्रीय स्तरावर 41-42 टक्के सिंचन झालेले नसून ते फक्त 38 टक्के आहे. मग देशामध्ये 38 टक्के सिंचन झालेले असताना राज्यात मात्र केवळ 16 टक्के सिंचन झालेले आहे. त्यातही मालगुजारी तलाव व विहिरी वगळल्या तर 16 टक्क्याचे प्रमाण किती खालपर्यंत जाईल याचा शासनाने अंदाज करावा. सिंचनाच्या बाबतीत शासनाचे योगदान काय आहे ? ही टक्केवारी 13-14 टक्क्याच्या पुढे जाऊ शकत नाही. याचाही शासनाने गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. (अडथळा)

सभापती महोदय, राज्याचा शेती विकास दर फक्त 2 टक्के आहे, तो 4 टक्क्यापर्यंत घेऊन जाणे आवश्यक आहे. डॉ.जाधव समितीने असा निष्कर्ष काढला आहे की, जोपर्यंत जल सिंचनासाठी निधी वाढविला जात नाही तोपर्यंत शेतकऱ्यांचे हाल थांबणार नाहीत. यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे असा मी या निमित्ताने शासनाला प्रश्न विचारतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रात 1910 नंतर यांत्रिक पध्दतीने शेती करण्याची सुरुवात झाली. यांत्रिक शेतीचा खरा प्रभाव पंजाब राज्यात झाला. आपल्याकडे मळणी व ट्रॅक्टर या यंत्राच्या पलीकडे आपण जाऊ शकलो नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना यांत्रिक शेतीचा, आधुनिक पध्दतीच्या शेतीचा उपयोग कधी पासून होणार आहे ? शासनाने त्या दृष्टीने प्रयत्न करावा.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

एकीकडे दुष्काळाची परिस्थिती व दुसरीकडे प्रचंड अतिवृष्टी होत आहे. हवामानात बदल होत आहे त्याला महाराष्ट्रही अपवाद नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील दुष्काळ पाहिले तर प्रथम बाराव्या शतकात गावदेवीचा दुष्काळ पडला होता. तो दुष्काळ सतत 12 वर्षे चालू होता. त्या दुष्काळामुळे लोक देशोधडीला लागले, उद्ध्वस्त झाले, परागंदा झाले, महाराष्ट्राच्या बाहेर गेले. गावदेवी कोपली आहे म्हणून दुष्काळ पडला आहे, अशी लोकांची धारणा होती. लोकांची चुकीची धारणा होती, अंधश्रध्दा होती. सन 1943 मध्ये बंगालमध्ये दुष्काळ पडला होता, त्यावेळी 40 लोक मृत्युमुखी पडले होते. त्यावेळी पंडित जवाहरलाल नेहरु आणि महात्मा गांधी यांनी इंग्रज सरकारकडे निषेध व्यक्त केला होता. सन 1769 मध्ये बंगालमध्ये दुष्काळ पडला होता त्यावेळी 45 लाख लोक मृत्युमुखी पडले होते. 1972 मध्ये महाराष्ट्रात दुष्काळ पडला त्यावेळी सुकडी नावाचा पदार्थ लोकांसमोर आला होता. दुष्काळाने आम्हाला सुकडी दिली. सुकडीने माणसांना जगविले होते. महाराष्ट्रातील हे चित्र बदलण्यासाठी शासनाने प्रयत्न करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, शेतीसाठी ठिबक व तुषार पध्दतीचा अवलंब केला पाहिजे, आपण विज्ञानाची कास धरली पाहिजे. पाण्याचा दुरुपयोग होता कामा नये या भावनेतून पाण्याचे नियोजन केले पाहिजे. शासन शेतक-यांना 50 हजार रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज देते. परंतु आजकाल 50 हजार रुपयामध्ये काही होत नाही. आज महागाई निर्देशांक पाहिला तर तो आकाशाला भिडलेला आहे. त्यामुळे कमीत कमी 1 लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी व 5 लाख रुपयांपर्यंत 2 टक्के दराने कर्ज देण्याची घोषणा शासनाने केली तर शेतक-यांच्या दृष्टीने ती उपयुक्त ठरु शकेल.

सभापती महोदय, पीक विम्याचा किती शेतकऱ्यांना फायदा होत आहे ? या योजनेमुळे शेतकऱ्यांचा नाही तर विमा कंपन्यांचा फायदा होत आहे. शेतकरी उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. तेव्हा याही बाबतीत सर्वंकष धोरण तयार करण्याची गरज आहे. शेतक-यांच्या कांद्याला भाव मिळाला की, मुंबई व पुण्यातील लोक आवई उठवितात. मध्यमवर्गीयांच्या डोळयात पाणी आले असे बोलले जाते. परंतु शेतक-यांचे डोळे कोरडे पडले आहेत. शहरात त्यांच्या विषयी सहानुभूती दाखवावयाची आणि तिकडे शेतकऱ्यांकडे गेल्यावर तुमच्या ऊसाला भाव देऊ असे सांगावयाचे. जर साखरेला भाव द्यावयाचा असेल तर शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव दिला पाहिजे. शेतकऱ्यांसमोर

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

जाऊन ऊसाला भाव देण्याची मागणी करावयाची आणि मुंबईला आल्यावर साखरेचे भाव कमी करण्याची मागणी करावयाची असे दुटप्पी धोरण योग्य नाही का ?

सभापती महोदय, खरे तर शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंबंधी मागील अधिवेशनाच्या वेळी प्रस्ताव दिला होता. त्यावेळी तो प्रस्ताव कामकाज पत्रिकेवर आला होता. पण माझ्या दुर्दैवाने तो प्रस्ताव चर्चेला आला नाही, तो लॅप्स झाला. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या सुदैवाने व माझ्या दुर्दैवाने त्यांचा प्रस्ताव स्वीकारण्यात आला. त्यामुळे माझा प्रस्ताव यावर्षी कामकाज पत्रिकेवर आला नाही. त्यामुळे सुदैवी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी मनापासून धन्यवाद देईन. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, आपल्या पक्षातील लोकांनी कितीही प्रयत्न केले तरी आपल्या जागेला कोणीही हात लावणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांची क्षमा मागून मी हे विधान करीत आहे. (अडथळा)

सभापती महोदय, महाकवी श्री.विठ्ठल वाघ यांची एक कविता आहे. त्यांनी शेतकऱ्यांच्या दुर्दशेचे शब्दात वर्णन केलेले आहे. ते असे म्हणतात की,

आम्ही जलमलो माती,
किती होणार गा माती ?
खापराच्या दिव्यातून
कधी पेटणार वाती ?
किती घरातून सूर्य
जात होऊन फिरतो
पिठासारखा ऊजेळ
घरभर पसरतो

अहो, त्या गरिबाच्या झोपड्यावर छप्पर नसल्यामुळे सूर्याचा उजेड सर्व घरभर भिंगरीसारखा फिरत असतो. सूर्याचा प्रकाश घरभर फिरत असतो. ही वैदर्भीय भाषा आहे. समोरच्या बाकावर सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई ह्या वैदर्भीय सुकन्या बसलेल्या आहेत. या सभागृहात

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

आदिवासींच्या वेदना त्या मांडत असतात. त्या रुक्मिणीच्या गावच्या आहेत. श्रीकृष्णाने रुक्मिणीला पळविले होते, हे महाभारतात सांगितलेले आहे. पण या श्रीकृष्णाने कुरुक्षेत्रावर तत्वज्ञान सांगितलेले आहे. तत्वज्ञान सांगण्याचा मोह रुक्मिणीच्या गावातील आमच्या एका कन्येला होत असेल तर तिचे अभिनंदन केले पाहिजे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

काया म्हशीवानी रात
नित आमुच्या दारात
निळा अंधार भरली
बसे पखाल रिचोत

गरिबाच्या घरामध्ये 24 तास अंधार आहे. हा अंधात त्यांच्या पाचवीलाच पुजलेला आहे.

नाही पाहिली पुनीव
लय ऐकायला गोष्टी
खापराच्या दिव्यातून
कधी पेटणार वाती ?
आम्ही जलमलो माती
कधी होणार गा माती
खापराच्या दिव्यातून
कधी पेटणार वाती ?
फास लावून जल्लाद
चाले कोणाचा वखर
खाली ढेकलाच्या वाणी
आम्ही होतो चूरचूर
फुलवल्या कापसाले
चंद्र चोरु चारु पाहे
तरी माय माऊलीची
मांडी उघळीच राहे.

सभापती महोदय, गरिबांना अंगावर वस्त्र घालायला मिळत नाही. फाटक्या वस्त्रामध्ये ते जीवन जगतात. काम मिळाले नाही म्हणून घराकडे परत फिरणारा मराठी माणूस अंगावरच्या जीर्ण झालेल्या वस्त्रांची दुकटी करुन ती तरी मुलांच्या अंगाखाली अंथरता येईल काय याची विवंचना वहातो आहे. एखाद्या झोपडीमध्ये एखादी मानिनी बाळंतपणाच्या वेदना सहन करते आहे. अंगाखांद्याखालून पाणी जात आहे. परंतु वरती छप्पर झाकायला तिच्याकडे काहीही नसल्यामुळे आर्त वेदनांचा हुंकार तिच्या मुखातून बाहेर पडतो आहे. बाहेर झेंडा फडकतो आहे. जय शिवाजी, जय शिवानीच्या घोषणा दिल्या जात आहेत. पण हिच्याकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ नाही. हे महाराष्ट्रातले चित्र आहे.

उभं आभाळ फाटल
कसी झाकणार छाती ?
दाणे भरता कणसात
येती हुशार पाखरं

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

11-08-2011 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) I-2

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 11:50

प्रा. सुरेश नवले.....

कापूस आला की दलाल आला. हुशार पाखरं म्हणजे हे सगळे दलाल आहेत. शेतक-यांचा लिलाव करणारे दलाल याला प्रतिबंध करण्यासाठी श्री. राधाकृष्ण विखे-पाटील साहेब, आपण प्रयत्न करावेत. पद्मश्री बाळासाहेब विखेपाटील साहेबांचे आपण वारसदार आहात. त्यांनी पहिला कारखाना काढला. शेतक-यांना दिलासा दिला. शेतक-यांचा हुंकार, कंदिलाच्या प्रकाशामध्ये शेतक-यांना सूर्य दिसावा म्हणून प्रयत्न करणारे क्रांतीवीर सूर्य पद्मश्री विखे-पाटील यांचे आपण वारसदार आहात. तुमच्याकडून आम्हाला अपेक्षा आहेत. आपण सौम्य प्रकृतीचे परंतु कणखर वृत्तीचे आहात.

दाणे भरता कणसात
येती हुशार पाखर
भर हंगामात मंग
होते पारखी भाकर

सभापती महोदय, हंगाम असताना सुध्दा या महाराष्ट्रामध्ये लोक उपाशी रहातात.

तुह्या पोटातल आग
पेट घेते अंगभर
मग कापल्या फणाची
फणि होते धारदार
कोण सांगाव रंगत
तिला लागणार किती

उद्योग मंत्री श्री. नारायण राणे साहेब हे सभागृहामध्ये हजर झालेले आहेत. या कवितेच्या शेवटच्या ओळी मी त्यांना समर्पित करतो. कारण ते काही तरी करु शकतील अशी महाराष्ट्र आशा लावून बसलेला आहे. महाराष्ट्रात अपेक्षा भंग होणार नाही.

आम्ही जलमलो माती
किती होणार गा माती
खापराच्या दिव्यातून
कधी पेटणार वाती

मी माननीय कृषी मंत्र्यांना विनंती करतो की या वाती पेटवण्याचा प्रयत्न आपण करावा. एखादे तेलाचे गाडगे घेऊन त्या पणतीमध्ये तेल टाका म्हणजे म्हणजे सगळया वाती तेवत राहातील आणि त्या वातींच्या प्रकाशामध्ये महाराष्ट्रातील शेतकरी स्वत:चा दिवस आनंदात घालवू शकेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

11-08-2011 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) I-3

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 11:50

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या संबंधात आणलेल्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी कवी विठ्ठल वाघ यांच्या कवितेमधून महाराष्ट्रातील चित्र समर्पकपणे या सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. भारतातील 65टक्के शेतकरी शेतीवर अवलंबून आहेत आणि त्यांचा देशाच्या उत्पन्नातील वाटा फक्त 16 टक्के आहे. याचा अर्थ देशातील 65 टक्के जनता अवघ्या 16 टक्के उत्पन्नावर गुजराण करीत आहे. उरलेली 35 टक्के जनता ही राष्ट्रीय उत्पननाच्या 84 टक्के वाट्यावर जगते म्हणायची की मजा मारते म्हणायची ? सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांना खूप उमाळा फुटतो. काय बोलावे, काय नाही अशी त्यांची भावना झालेली आहे. माझी देखील तीच भावना आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, शेतक-यांच्या जीवनमरणाची उंची दर्शविणारी आजची स्थिती आहे. पूर्वी साधारणपणे 7-8 जूनच्या दरम्यान उन्हाळयामध्ये तापलेली काळी आई, जी शेतक-यांने नांगरुन ठेवलेली असायची तिच्यावर पावसाचा शिडकावा पडला की कितीही सुगंधी अत्तर असले तरी त्या अत्तरापेक्षाही अतिशय सुगंधीत असा मृद्गंध अनुभवायला मिळायला. परंतु ऋतुमान बदलले आहे. पाऊस कधी पडेल हे कुणी सांगायला तयार नाही. पाऊस बेभरवशाचा झालेला आहे. त्यामुळे जो शेतकरी जूनच्या पहिल्या, दुस-या किंवा तिस-या आठवड्यामध्ये आपला पेरणीचा कार्यक्रम आटोपून घ्यायचा त्याला आता जुलै संपून ऑगस्ट उजाडला तरी पावसाचा थेंब दिसत नाही. आपण असे गृहीत धरले की जूनच्या पहिल्या आठवड्यात पाऊस पडला आणि नांगरलेल्या शेतक-याने आपले बी पेरायचे ठरवले तर आज बियाची जी काही परिस्थिती आहे तशी परिस्थिती निर्माण झाली तर शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त होईल. आज बियाण्यामध्ये ड्युलीकेशन होत आहे. तसेच बियाण्यामध्ये लिंकिंगचा जो काही प्रकार होत आहे तो अतिशय गंभीर आहे. माननीय कृषी मंत्र्यांनी बियाण्याच्या लिंकिंगच्या बाबतीत कडक पावले उचललेली आहेत. त्याबद्दल विरोधी पक्षानेही आपल्या चांगल्या कार्यकर्तृत्वाचा सन्मान करीत आहेत. मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, जेवढे ड्युप्लिकेट बियाणे आज बाजारात उपलब्ध आहे त्याच्या दुपटीने हा लिंकिंकचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

11-08-2011 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) I-4

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 11:50

श्री. जयवंतराव जाधव....

सभापती महोद, मी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पावसाचा जो प्रकार अनुभवायला मिळत आहे त्यापध्दतीचे बियाणे विकसित करणे आवश्यक आहे. एकाच तालुक्यातील पावसाचे प्रमाण पाहिले तर शासकीय वेधशाळा आणि हवामान खाते हे तालुक्याच्या ठिकाणी पडलेल्या पावसाची नोंद घेतात आणि संपूर्ण तालुक्यासाठी ते प्रमाण गृहीत धरतात. परंतु प्रत्यक्षात तालुक्याच्या आजूबाजूच्या परिसरातील पावसाचे प्रमाण पाहिले तर ते एकसारखे नसते. तालुक्याच्या पूर्वेला पाऊस पडल्यानंतर जे बियाणे शेतकरी पेरतात तेच बियाणे पश्चिमेला पाऊस पडल्यानंतर शेतकरी पेरतात...

...नंतर श्री. भोगले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.भगवान साळुंखे) : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव हे ऑन लेग राहतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.01 ते 12.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने शासनास सादर केलेल्या ठरावांबाबत व मागण्यासंबंधी कार्यवाही होणेबाबत

(1) *18340 श्री.रामनाथ मोते, श्री.संजय केळकर, श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक 13118 ला दिनांक 29 मार्च,2011 दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने शिक्षण विभागाशी संबंधीत 8 ठराव 9 मागण्यांच्या निवदेनावर शासनाने केलेल्या कार्यवाहीचे व निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(2) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(3) 18 महिन्यांपुर्वी दिलेल्या निवेदनावर कार्यवाही करण्यासाठी व निर्णय घेण्यासाठी अद्यापही किती कालावधी लागणार आहे?

##श्री.राजेंद्र दर्डा : (1) बहुतांश मागण्यांबाबत कार्यवाही चालू आहे.

(2) धोरणात्मक स्वरुपाच्या बाबी आहेत.

(3) प्राप्त झालेल्या निवेदनातील मागण्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सेवाशर्तीसंबंधी असून त्यापैकी बहुतांश मागण्यांवर कार्यवाही सुरु आहे.

(सन्माननीय सदस्यांनी उपप्रश्न विचारले नाहीत)

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषण देत असतात)

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मावळ (जि. पुणे) येथील पवना धरणाबाबत आंदोलकांवर झालेला गोळीबारासंबंधी

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, काल सभागृहात नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावर मावळ (जि. पुणे) येथील पवना धरणाच्या संदर्भात आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर पोलिसांनी केलेल्या गोळीबाराबाबत चर्चा झाली. पण कालच संध्याकाळी एक गंभीर बातमी ऐकायला मिळाली, त्याचे फोटोग्राफ्स माझ्याकडे आहेत तसेच वर्तमान पत्रातून सुध्दा ही बातमी आली आहे. येथे जो गोळीबार करण्यात आला त्यात तिघांचा मृत्यू झालेला आहे, असेही काल सांगण्यात आले पण या तीन मृतांमध्ये श्री. मोरेश्वर साठे या शेतकऱ्याचा मात्र गोळीबारात मृत्यू झालेला नसून त्याला पोलिसांनी पकडून गाडीत कोंबले व त्याचे एन्काऊंटर केले. हा शेतकरी गोळीबारात जखमी झालेला नाही अशा क्लिप्स सुध्दा रात्री दाखविण्यात आल्या. त्यामध्ये असेही दाखविण्यात आले की, आंदोलनकर्ते शेतकरी पळत होते व त्यांचा पाठलाग करीत पोलीस त्यांच्या मागे पिस्तुल व बंदुका घेऊन धावत होते, असा प्रकार राज्यात कधीही घडलेला नाही. या शासनाने एका शेतकऱ्याचे एन्काऊंटर केलेले आहे, हे प्रकरण अतिशय गंभीर आहे म्हणून या विषयावर सभागृहात पुन्हा चर्चा झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. एखाद्या माफियाचे किंवा अजमल कसाबचे एन्काऊंटर पोलिसांनी केले असते तर आम्ही समजू शकलो असतो पण अशा प्रकारे शासन जर राज्यातील शेतकऱ्याचे एन्काऊंटर करीत असेल तर या शासनाला सत्तेवर राहण्याचा नैतिक अधिकार नाही, तसेच या घटनेपेक्षा सभागृहाचे कोणतेही कामकाज महत्वाचे नाही.म्हणून या विषयावर चर्चा झाली पाहिजे, म्हणून यासंबंधी आजच सभागृहात चर्चा होणे आवश्यक आहे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, या सभागृहात उत्तर देताना माननीय गृह मंत्र्यांनी सभागृहाची व राज्यातील जनतेची सुध्दा सरळसरळ दिशाभूल केली आहे. मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, कोठून तरी गाडी आली व त्यातून गोळीबार करण्यात आला. पण पाच किलोमीटर पर्यंतचा रस्ता रोखलेला होता, रस्ताच बंद होता तर गाड्या कोठून येणार, हा महत्वाचा मुद्दा आहे. तसेच येथे शासनाचे 700 ते 800 पोलीस तैनात होते, मग पोलिस या गाडीतील लोकांना पकडू शकले असते, तरी देखील अशा प्रकारचे उत्तर देऊन मंत्री महोदयांनी सभागृहाची दिशाभूल केली आहे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषण देत असतात)

श्री. अजित पवार : महोदय, कालच या सभागृहात पवना धरणाच्या संदर्भात केलेल्या आंदोलनाबाबत चर्चा झाली व त्या चर्चेला उत्तर देताना शासनाने आपली भूमिका सुध्दा मांडली. माननीय विरोधी पक्षनेत्यांना ज्या गोष्टी सभागृहात सांगाव्याशा वाटल्या, त्या सभागृहात सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांनी जो मुद्दा सभागृहात आता उपस्थित केला.....अडथळा.....सभागृहात काल माननीय गृह मंत्र्यांनी या प्रकरणाची निवृत्त न्यायाधीशांमार्फत चौकशी केली जाईल असे उत्तर दिले आहे. पण सभागृहात आता मात्र पोलिसांनी एन्काऊंटर केले, शेतकरी पळतात व मागून पोलीस गोळीबार करतात अशी वक्तव्ये केली जात आहेत. या अनुषंगाने माझी एवढीच विनंती आहे की, ही संपूर्ण माहिती आपण नेमलेल्या चौकशीतून बाहेर येणारच आहे.....अडथळा.....शेवटी याची चौकशी कोणीतरी केलीच पाहिजे, जेणेकरुन त्यात तथ्य किती आहे हे समोर येईल. तसेच निवृत्त न्यायाधीशांच्या मार्फत जी चौकशी नेमली ती तीन महिन्याच्या आत पूर्ण करण्यात येईल व त्यातून वस्तुस्थिती पुढे येईलच. तसेच या घटनेच्या पाठीमागे कोण होते, कशामुळे या तीन नि:ष्पाप शेतकऱ्यांचा बळी गेला याबद्दलची संपूर्ण माहिती मिळेल. म्हणून माझी विनंती आहे की, सभागृहासमोर असलेले कामकाज विचारात घ्यावे.

.....4

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषण देत असतात)

2 स्तरावरील द्विलक्षी व एच एस सी व्होकेशनल अभ्यासक्रमातील पूर्णवेळ निदेशक या पदाचे नाव बदलून ते पूर्ण वेळ शिक्षक करण्याबाबतचे निवेदन

(2) * 17997 डॉ.रणजित पाटील , श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक 13366 ला दिनांक 29 मार्च, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) 2 स्तरावरील द्विलक्षी व एच एस सी व्होकेशनल अभ्यासक्रमातील पूर्णवेळ निदेशक या पदाचे नाव बदलून ते पूर्ण वेळ शिक्षक करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी दिनांक 28 मार्च, 2011 रोजी मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(3) असल्यास, उक्त कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(4) अद्यापपर्यंत कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

##श्री.राजेश टोपे : (1) होय

(2) व (3) सदरहू निवेदन शासन स्तरावर सादर झाले असता पूर्वी घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पूर्णवेळ निदेशकाच्या पदनामात बदल करु नये असा निर्णय शासन स्तरावर झाला आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

(सन्माननीय सदस्यांनी उपप्रश्न विचारले नाहीत)

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

सभापती : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुहे मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(12.22 ते दुपारी 12.42 पर्यंत बैठक स्थगित झाली)

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात.)

सभापती : आता तारांकित प्रश्न क्रमांक 18,455 चर्चेला घेण्यात येईल.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी महत्वाची माहिती सदनाला दिलेली असल्यामुळे त्यासंदर्भात अधिक माहिती देण्यासाठी मी उभा आहे. आफ्टर थॉट पेक्षा ही माहिती कालच माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सभागृहाला दिली असती तर या बाबतीतील चौकशी मी कालच घोषित केली असती. घडलेल्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यासंदर्भात उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधिशांकडून या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल ही बाब अगोदरच घोषित करण्यात आलेली आहे. या आठवडयात आम्ही कोणत्याही परिस्थितीत उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीशाच्या मार्फत सदर घटनेची चौकशी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या घटनेच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडे जी काही माहिती असेल ती माहिती त्यांनी चौकशीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या माजी न्यायाधीशांकडे द्यावी किंवा ती माहिती ते शासनाकडे सुध्दा देऊ शकतात. या बाजूला आम्ही बसलो आहोत म्हणून आम्ही शेतक-यांच्या विरोधात आहोत असे समजण्याचे मुळीच कारण नाही. सदनाच्या मार्फत मी या घटनेच्या संदर्भातील शेतक-यांना सांगू इच्छितो की, जर अशा पध्दतीची कारवाई कोणाच्या हातून घडली असेल तर त्यांचे सस्पेन्शन करणे, नोकरीतून काढणे एवढेच न करता मी त्यांच्यावर कलम 302 लावून मनुष्य वधाचा गुन्हा दाखल केल्याशिवाय राहणार नाही. एका बाजूने अशा प्रकारची ग्वाही देत असतांना मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, या घटनेच्या संदर्भात अजून काही माहिती पोलीस दलाला प्राप्त व्हावयास लागली असून या घटनेमध्ये पहिल्यांदा झालेली फायरींग खाजगी गाडीतून झाली होती व त्याबाबत आता पुष्टी मिळावयास लागली आहे. त्यामुळे यासंदर्भातील पूर्ण चौकशी करण्यात येईल. तसेच या संपूर्ण घटनेच्या पाठीशी कोण आहे त्याचा सुध्दा पर्दाफाश केला जाईल.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात.)

नागरिकांच्या, आंदोलकांच्या गाडया ज्या पोलीस कर्मचाऱ्यांनी फोडल्याच्या क्लिप्स् बघावयास मिळाल्या त्यांना सस्पेंड करण्याचा निर्णय मी कालच घोषित केलेला आहे. या घटनेमध्ये कोणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री. आर.आर.पाटील....

चुकले असेल तर कोणालाही पाठीशी घालण्याचे काम सरकार करणार नाही. परंतु मृत्युमुखी पडलेल्या शेतक-यांबाबत राजकारण करण्याचे पाप विरोधकांनी करु नये एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती : ठीक आहे. आता प्रश्नोत्तरे घेण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात.)

राज्यातील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल करण्याबाबत

(३) * १८४५५ श्री.कपिल पाटील , श्री.जयंत पाटील , श्री.रामनाथ मोते , श्री.संजय केळकर , श्री.नागो गाणार , श्री.भगवान साळुंखे : तारांकित प्रश्न क्रमांक १३३७७ ला दिनांक २९ मार्च, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी माध्यमिक शाळांमधील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्याच्या संदर्भातील प्रस्ताव उच्चस्तरीय समितीपुढे सादर करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) तसेच सदरहू प्रकरणी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व शासनाने दिलेल्या लक्षवेधी वरील आश्वासनानुसार काय कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

iप्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्या करिता : (१) नाही.

(२), (३) व (४) उच्चस्तरीय सचिव समितीपुढे प्रस्ताव सादर करणेसाठी माहिती क्षेत्रीय यंत्रणांकडून प्राप्त होताच समितीपुढे सादर करणेत येईल.

श्री. कपिल पाटील : ज्या ठिकाणी पूर्णवेळ ग्रंथपाल रिक्त झालेले आहेत,आणि जेथे गरज आहे, सर्व ठिकाणी अर्धवेळ ग्रंथपाल नाहीत. पण खरोखरच जेथे पूर्णवेळ ग्रंथपालांची पदे रिक्त झालेली आहेत तेथे ग्रंथपालांची नियुक्ती केली जाणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ही बाब तपासून घेण्यात येईल.

सभापती : तारांकित प्रश्न क्रमांक 17882

(उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात.)

वेंगुर्ला (जि.सिंधुदुर्ग) येथील मे.रेडी पोर्ट लिमिटेड यांनी व्हॉरफेज शुल्कात केलेली वाढ

(5) * 19349 श्री.जगदीश गुप्ता , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.संजय केळकर : तारांकित प्रश्न क्रमांक 16393 ला दिनांक 5 एप्रिल, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) वेंगुर्ला (जि.सिंधुदुर्ग) येथील रेडी बंदर महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डामार्फत चालविण्यात येत असताना माल हाताळणीपोटी प्रती टन रुपये 45 प्रमाणे व्हॉरफेज शुल्क वसूल करण्यात येत होते, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, आता रेडी पोर्ट लिमिटेड या खाजगी विकासकाकडे हे बंदर चालविण्यासाठी दिल्यानंतर त्यांचेकडून प्रती टन रुपये 65 या प्रमाणे व्हॉरफेज शुल्क वसूल करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, बंदराचा कोणताही विकास न करता व्हॉरफेज शुल्कात वाढ केल्यामुळे शासनाचे सुमारे 50 ते 60 कोटी रुपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप, चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.नारायण राणे : (1) व (2) हे खरे आहे.

(3) शासनाने दिलेल्या मान्यतेअंती, रेडी बंदर विकासासाठी करारनामा स्वाक्षांकीत केल्यानंतर रेडी पोर्ट लिमिटेड यांनी बंदरातील अस्तित्वातील सुविधा व शासकीय मत्ता यांच्या मुल्यांकनापोटी रुपये 4,58,47,000/- इतकी रक्कम महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे जमा केली. सविस्तर प्रकल्प अहवाल पर्यावरण विषयक अहवाल व इतर तांत्रिक अभ्यास करण्यासाठी रुपये 2.61 कोटी इतका खर्च केला आहे. याशिवाय बंदरातील अस्तित्वातील मालहाताळणी सुविधांची सुधारणा, सुरक्षा व्यवस्था इत्यादी कामे केली.

खाजगीकरणातून बंदर विकासाच्या धोरणानुसार बंदरात पुरविण्यात येणाऱ्या सेवांकरीता शुल्क ठरविण्याचे स्वातंत्र्य संबंधीत बंदर विकासकाला असून शासनाने त्याचेकडून सवलतीच्या दराने व्हॉरफेज शुल्क आकारावयाचे आहे. बंदर विकास प्रकल्पात खाजगी क्षेत्राकडून मोठया प्रमाणात गुंतवणूक आकृष्ट करण्याकरिता ही सवलत देण्यात आलेली आहे. तथापि आगामी कालावधीत रेडी बंदरात टप्प्याटप्याने सुमारे 4400 कोटी इतकी मोठी गुंतवणूक अपेक्षित असून बारमाही बंदर सुविधा निर्माण होणार आहेत.

यामुळे शासनाचे नुकसान होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(4) व (5) प्रश्न उद्भवत नाही.

(उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2 स्तरावरील द्विलक्षी व एच एस सी व्होकेशनल अभ्यासक्रमातील पूर्णवेळ निदेशक या पदाचे नाव बदलून ते पूर्ण वेळ शिक्षक करण्याबाबतचे निवेदन

(2) * 17997 डॉ.रणजित पाटील , श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक 13366 ला दिनांक 29 मार्च, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) 2 स्तरावरील द्विलक्षी व एच एस सी व्होकेशनल अभ्यासक्रमातील पूर्णवेळ निदेशक या पदाचे नाव बदलून ते पूर्ण वेळ शिक्षक करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी दिनांक 28 मार्च, 2011 रोजी मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(3) असल्यास, उक्त कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(4) अद्यापपर्यंत कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.राजेश टोपे : (1) होय

(2) व (3) सदरहू निवेदन शासन स्तरावर सादर झाले असता पूर्वी घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पूर्णवेळ निदेशकाच्या पदनामात बदल करु नये असा निर्णय शासन स्तरावर झाला आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय,.....(अडथळा)

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

सभापती : सन्माननीय सदस्यांना वारंवार सूचना देऊनही ते सभागृहात शांतता ठेवत नाहीत, अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांकरिता स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.47 ते 1.07 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

तालिका सभापती : मी सभागृहाची बैठक दुपारी 1.15 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.07 ते 1.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी सन्माननीय सभापती)

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने बुधवार, दिनांक 10 ऑगस्ट 2011 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : बुधवार, दिनांक 10 ऑगस्ट, 2011 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. रणजित कांबळे (अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "भिवंडी (जि.ठाणे) येथील शासकीय गोदामातील गहू नेरळ पोलिसांनी पकडल्याबाबत" या विषयावरील सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील,वि.प.स. यांच्या दिनांक 6 एप्रिल, 2011 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 13143 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : अधिक माहिती छापावी)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "पुणे शहरातील बेकायदेशीर जलक्रीडा केंद्राबाबत" या विषयावरील सर्वश्री मोहन जोशी, विजय सावंत, वि.प.स. व श्री. हुसेन दलवाई, माजी वि.प.स. यांच्या दिनांक 1 एप्रिल, 2011 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 13998 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : अधिक माहिती छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शोक प्रस्ताव

मु.शी.: श्री. पी.सी.अलेक्झांडर, माजी राज्यपाल यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. पी.सी. अलेक्झांडर, माजी राज्यपाल यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"श्री. पी. सी. अलेक्झांडर, माजी राज्यपाल यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

(प्रेस : येथे सोबत जोडलेला शोकप्रस्ताव छापावा.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते सन्माननीय उप मुख्य मंत्री श्री. अजित पवार साहेबांनी श्री. पी.सी. अलेक्झांडर, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला समर्थन देण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, श्री. पी.सी. अलेक्झांडर हे एक वेगळया प्रकारचे व्यक्तिमत्व होते. त्यांच्या कार्याचा आलेख सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी वाचून दाखविला आहे. सन 1993 ते 2002 पर्यंत दीर्घकाळ ते आपल्या महाराष्ट्राचे राज्यपाल होते. त्यांच्या कारकिर्दीमधील उल्लेखनीय कामगिरी सांगितली पाहिजे की, विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या विभागाच्या अनुशेषाच्या अनुषंगाने त्यांच्या काळात घटनेच्या 371(2) या कलमान्वये वैधानिक विकास मंडळांची स्थापना झाली. त्याशिवाय खूप कामे श्री. पी.सी. अलेक्झांडर यांच्या कार्य काळात झाली. विशेष करुन त्यांनी मागास विभागाला न्याय देण्याचे काम केले आहे. बजेट व्यतिरिक्त अतिरिक्त निधी मागास विभागाला दिला पाहिजे या भूमिकेवर ते सदैव ठाम असायचे. अशापध्दतीने मागास विभागाला न्याय देणारा उत्तम प्रशासक त्यावेळी पहिल्यांदा या राज्याला लाभला.

सभापती महोदय, श्री. पी.सी.अलेक्झांडर यांचे व्यक्तिमत्व असे होते की, त्यांची आपल्या राज्यातील राज्यपालाची कारकीर्द संपल्यानंतर सन 2002 मध्ये त्यांना राज्यसभेवर पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबतचा निर्णय होत असतांना शिवसेना, भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी कॉग्रेस या तिन्ही पक्षांनी मिळून श्री.पी.सी.अलेक्झांडर यांच्या नावाला पाठिंबा दिला. पूर्वी त्यांनी देश पातळीवर काम केले असल्यामुळे त्यांचे देश पातळीवरील कर्तृत्व अबाधित होते. स्वर्गीय श्रीमती इंदिराजी गांधी आणि स्वर्गीय श्री.राजीवजी गांधी यांच्या काळात त्यांचे सचिव म्हणून त्यांनी काम केले होते. या करिता एक कुशल प्रशासक राज्यसभेमध्ये असला पाहिजे या भूमिकेतून त्यांना राज्यसभेवर पाठविण्याची भूमिका घेण्यात आली.

सभापती महोदय, मला आठवते की, त्या काळात राष्ट्रपती पदासाठी निवडणूक जाहीर झाली होती. त्या पदासाठी श्री. पी.जे.अबूल कलाम यांचे नाव येण्यापूर्वी श्री. पी.सी. अलेक्झांडर यांचे नाव माजी पंतप्रधान सन्माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी साहेबांनी सुचविले होते. परंतु काही कारणामुळे त्यांच्या नावाला मान्यता मिळण्याच्या बाबतीत एकमत झाले नाही म्हणून त्यांना राष्ट्रपती होता आले नाही. अशाप्रकारे एका चांगल्या प्रशासकाचे दि. 10 ऑगस्ट, 2011 रोजी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

दु:खद निधन झाले आहे. त्यांची महाराष्ट्रातील प्रदीर्घ कारकीर्द पहाता महाराष्ट्रातील विकासामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. म्हणून त्यांच्या निधनामुळे हा महाराष्ट्र ज्याने चांगल्या प्रकारचे काम केले अशा एका नेत्याला आणि एका प्रशासकाला मुकला आहे. विरोधी पक्षाच्या वतीने मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो व सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या ठरावाला पाठिंबा देतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, या महाराष्ट्र राज्याला श्री.पी.सी.अलेक्झांडर नावाचे बुजूर्ग नेतृत्व राज्यपाल म्हणून लाभले होते. याठिकाणी बुजूर्ग हा शब्द यासाठी वापरला आहे की, त्यांना दिल्ली येथील प्रशासकीय कामकाजाचा प्रचंड अनुभव होता. पण ते आय.ए.एस.नव्हते तर ते आय.सी.एस.होते आणि त्यांनी इंग्रजांच्या काळामध्ये त्या पदावर नोकरी केली होती म्हणजे त्या प्रशासकीय पध्दतीतील ते मूळ घटक होते आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते येथील प्रशासकीय सेवेमध्ये काम करीत होते. त्यांचा येथील राज्यपाल पदाचा कार्यकाळ होता, त्यावेळी माझा त्यांच्याशी फार जवळून संबंध आला. त्यांना महाराष्ट्रातील काना-कोपऱ्याची इत्यंभूत चांगली माहिती होती आणि ती माहिती विकासाच्या दृष्टीने होती. येथील मागास भाग कसा आहे आणि त्यासाठी काय करावयास पाहिजे यासंदर्भात त्यांचे सखोल ज्ञान होते. वैधानिक विकास मंडळांचे प्रमुख असताना, त्यांनी या विविध मंडळाकडे खास लक्ष दिले होते. या साठी महिन्यातून एकदा आढावा बैठक घेऊन त्याठिकाणी काय सुरु आहे याची माहिती ते घेत होते. आम्ही राजकीय क्षेत्रातून त्या मंडळावर नियुक्त झालो होतो म्हणजे याबाबतीत जे तज्ज्ञ नेमलेले होते, त्यांच्या वेगळया बैठका घेऊन त्यांना ते मार्गदर्शन करावयाचे. वैधानिक विकास मंडळाची स्थापना झाल्यानंतर तीन वैधानिक विकास मंडळामध्ये काम काय,तर फक्त तज्ज्ञ समितीच्या माध्यमातून त्या-त्या भागातील अनुशेष काढून, त्याचा अभ्यास करुन मग सर्व बाबी एकत्रित करुन त्याबाबत राज्य शासनाला मार्गदर्शन करणे हा महत्वाचा भाग होता आणि तो घटनात्मक होता. पण त्यांच्या असे लक्षात आले की, जर एवढेच काम करावयाचे असेल तर या मंडळाला काही महत्व रहाणार नाही. म्हणून त्यांनी राज्य शासनाकडे खास आग्रह धरुन तीनही वैधानिक विकास मंडळाकरता 100 कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन घेतला आणि अनुशेषाच्या प्रमाणात वाटून दिला.

सभापती महोदय, त्यांच्या काळातील एक खास वैशिष्ट्य असे होते की, हा निधी कसा वापरावयाचा याचा अधिकार वैधानिक विकास मंडळाला नव्हता.वैधानिक विकास मंडळाच्या वाट्याला जो निधी आलेला आहे, त्याच्या माध्यमातून कोणती कामे करावयाची आहेत त्याची यादी करावयाची आणि ती माननीय राज्यपाल महोदयांकडे पाठवावयाची. मग त्यांच्या अधिकाऱ्यांनी त्याची छाननी केल्यानंतर सचिवालयातील प्लॅनिंग विभागाने ही कामे मंजूर केल्यानंतर ही कामे मार्गी लागणार. अशा प्रकारे त्यांच्या काळामध्ये तीनही भागामध्ये विधायक कामांचा वेगळा आराखडा आखला गेला. मला हे देखील आठवते की, युती शासनाच्या काळामध्ये खास करुन मराठवाड्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी त्यांनी हेलिकॉप्टरच्या सहाय्याने आठ दिवस सर्व मराठवाडा पिंजून काढला. त्यावेळी त्यांनी मलाही सोबत घेतले होते आणि मी आठ दिवस त्यांच्या बरोबर हेलिकॉप्टरमधून फिरत होतो.ज्याठिकाणी हेलिकॉप्टरने पहाणी करणे शक्य आहे तेथे त्याचा वापर केला नाहीतर त्यांच्या गाडीमधून पहाणी करीत होतो. त्या काळामध्ये केलेल्या चर्चा आणि जुन्या आठवणीं याबाबत ते नेहमी बोलत असत. त्यावेळी माझ्या असे लक्षात आले की, आपल्याला श्री.पी.सी.अलेक्झांडर साहेब जसे दिसतात तसे नाहीत. महाराष्ट्रातील मंत्री महोदय, सन्माननीय सदस्य यांच्या व्यक्तीमत्वाबाबत त्यांनी अभ्यास केलेला आहे. त्यांच्या गाडीमध्ये कोणी बसावे, हे ते ठरवीत असत. ते गाडीमध्ये त्यांच्या बाजूला नेहमी मला आणि समोरच्या बाजूला ए.डी.सी.ला बसवावयाचे. त्यावेळी माननीय श्री.अशोकजी चव्हाण मंत्री होते. ते पुढे बसावयास गेले तर त्यांना त्यांच्या ऑर्डलीने सांगितले की, येथे बसता येणार नाही. गाडीमध्ये त्यांच्याशी बोलत असताना उस्मानाबाद ते तुळजापूर बाबत बोललो. त्यावेळची आठवण फार महत्वाची आहे आणि ती माझ्या कायम लक्षात राहील. आम्ही तुळजापूरच्या घाटामध्ये आल्यानंतर ते म्हणाले की, "This is the spot, Mr. Raote" त्यानंतर त्यांनी जे सांगितले ते महत्वाचे होते. त्यावेळी पुढच्या बाजूला माननीय डॉ.पद्मसिंह पाटील बसले होते आणि मागच्या बाजूला ते आणि त्यावेळचे माननीय मंत्री महोदय बसले असतील. परंतु गाडी चालवित असताना ड्रायव्हरला हार्ट ॲटॅक आला आणि ड्रायव्हर गाडीतच मरण पावला. त्यावेळी त्याच्या बाजूला डॉ.पद्मसिंह पाटील बसले होते. त्यांनी आपले कसब दाखवून तातडीने त्या ड्रायव्हरच्या ताब्यातून गाडी आपल्या ताब्यात घेतली. त्यामुळे मोठा अपघात टळला. त्यांनी मला हे सगळे सांगितले, तेव्हा डॉ.पद्मसिंह पाटील यांच्या बद्दल प्रचंड आदर वाटला.ड्रायव्हरला गाडी चालविताना हार्ट ॲटॅक येऊ शकतो,मग तेव्हा पासून निर्णय झाला की, यापुढे पुढच्या सीटवर त्यांच्या सैन्यातील ऑर्डर्ली बसेल अशा प्रकारे त्यांचे काटेकोरपणे नियोजन असावयाचे.

सभापती महोदय, कधी-कधी ते मला बोलावयाचे तसे ते इतरांनाही बोलावित असले पाहिजेत. ते मला सहज म्हणावयाचे की, "Yes, Mr. Raote, it is possible. You please come in the evening." म्हणजे गप्पा मारण्यासाठी आणि त्यांच्या गप्पा म्हणजे हवामानाच्या बाबतीत नव्हत्या तर त्या गप्पातून ज्ञान मिळावयाचे. कै.इंदिरा गांधी यांच्या काळातील अनेक बाबी ते बोलता-बोलता सांगावयाचे. त्यावेळी ते बोलले की, I am going to write on this आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याप्रमाणे त्यांनी तसे पुस्तक प्रसिध्द देखील केले. ते या महाराष्ट्रामध्ये प्रदीर्घ काळ राज्यपाल म्हणून राहिले.त्यामुळे राजकारणातील विविध व्यक्तिमत्व, विविध नेतृत्व यांच्याशी त्यांचा आपुलकीचा,ओलाव्याचा संबंध होता.म्हणून या राज्यातून माननीय राज्यपाल म्हणून ते निवृत्त झाल्या नंतर सुध्दा हळहळ वाटली. स्वच्छ, स्पष्ट आणि वैचारिक भूमिका असलेले एक वेगळे भारदस्त असे त्यांचे व्यक्तिमत्व होते.ते राज्यपाल पदावरुन निवृत्त झाल्यानंतरही महाराष्ट्र त्यांच्या प्रेमात पडला असल्यामुळे ते आपलेच असावेत म्हणून शिवसेना, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी पक्ष यांनी त्यांना खासदार म्हणून दिल्लीला पाठविले.

सभापती महोदय, खासदारकीच्या काळामध्ये खासदार निधी वापरण्याच्या बाबतीत ते खास पर्टीक्युलर होते आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार, तुम्हाला आठवत असेल की, त्यांच्या खासदार निधीतील जास्तीत जास्त पैसा त्यांनी ग्रामीण भागातील हागणदारी मुक्त योजनेसाठी खर्च केला होता म्हणजे एखाद्याला प्रश्नाची जाण किती असू शकते ते यावरुन दिसून येते.या राज्यामध्ये राज्यपाल पदावर काम करणाऱ्या व्यक्तीमत्वाला महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील समस्यांची एवढी जाण होती की, त्यांनी आपला खासदारकीचा निधी यासाठी वापरला. राजकीय प्रगल्भता, वैचारिक प्रगल्भता आणि प्रचंड अनुभव असलेले व्यक्तीमत्व काळाच्या आड गेले. खऱ्या अर्थाने ते ज्या राज्यातील होते, त्यामुळे त्यांच्याबद्दल खरी हळहळ महाराष्ट्र राज्यातील जनतेला वाटत आहे.काल श्री.पी.सी.अलेक्झांडर गेले ही बातमी आल्यानंतर त्यांना आदरांजली कधी वाहणार असा विषय उपस्थित झाला.काल आम्ही जेव्हा आपल्याला सांगितले, तेव्हा शासनाने आपल्या माध्यमातून माहिती दिली. खरे म्हणजे हा काही कौतुकाचा विषय नाही, चांगला विषय नाही. श्री.पी.सी.अलेक्झांडर हे वयानुसार कालवश झालेले आहेत. या सभागृहाचे माननीय नेते, उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला मी भावपूर्ण समर्थन देतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

. . . .ओ-4

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या राज्यपालपदी प्रदीर्घ काळ आपला ठसा उमटवून गेलेले आणि कायदा, प्रशासन व तत्वज्ञान या तीनही क्षेत्रामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्वत:चे कतृत्व गाजविलेले आणि भारतीय राजकारणामध्ये सत्तेवर आणि विरोधामध्ये असलेल्या दोघांची मने ज्यांनी जिंकली होती असे श्री.पी.सी.अलेक्झांडर, माजी राज्यपाल हे कालवश झालेले आहेत. त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

. . . .ओ-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री.पी.सी.अलेक्झांडर यांचे दु:खद निधन झालेले आहे. या देशामध्ये आय.सी.एस.आणि आय.ए.एस.ही जी प्रशासनाची भक्कम चौकट आखून देण्यात आलेली होती, त्या चौकटीतील श्री.

पी.सी.अलेक्झांडर हे महत्वाचा चिराग होते. देशाच्या सर्वोच्च पदी असलेल्या माननीय पंतप्रधान यांच्या कार्यालयात काम करताना, त्यांनी अतिशय जाणीवपूर्वक या देशाच्या सर्व परिस्थितीचे आकलन केले आणि त्यादृष्टीने सत्ताधाऱ्यांना प्रशासनाची चौकट तयार करण्यासाठी मार्गदर्शन करण्याचे काम त्यांनी अतिशय उत्कृष्टपणे केले.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

महाराष्ट्रात त्यांचा दीर्घ असा सहवास होता. राज्यपाल पदाची गरिमा सांभाळत असताना राज्यपाल म्हणून जी कर्तव्ये असतात आणि विशेष करुन सामाजिक न्यायाच्या बाबतीत मग ती शिक्षणाची असतील, आरोग्याची असतील, ग्रामविकासाची असतील, या सर्वच क्षेत्रात त्यांनी बारकाईने लक्ष दिले आणि त्यामुळे राज्यकर्त्यांवर सुध्दा एक प्रकारचा त्यांचा चांगल्या अर्थाने अंमल कायमच राहिला. राज्यसभेत गेल्यानंतरच्या काळात सुध्दा तेथे थोडा अधिक वेळ मिळतो, स्वस्थताही असते त्यामुळे आपल्या या प्रदीर्घ वाटचालीबद्दलचे लेखन त्यांनी केले. कारण मुळामध्ये ते चांगले लेखक होते, समाजचिंतक होते त्यामुळे हे सगळे ज्ञान पुस्तक रुपाने सुध्दा पुढच्या पिढ्यांना उपयोगी पडावे अशा पध्दतीचे मोठे काम त्यांनी केले आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील आयसीएसच्या काळातील जी शेवटची पिढी होती त्यातील कदाचित ते शेवटचा मालुसरा असतील. महाराष्ट्रासाठी त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील इतके महत्वाचे होते. महाराष्ट्रामध्ये जी काही असंतुलनाची कारणे होती त्याचा शोध घेण्याची सुरुवात सुध्दा श्री. अलेक्झांडर साहेबांनी केली. इतके ज्ञानी, विचारवंत, समाजोपयोगी योजनांना चालना देणारे आणि हे करीत असताना राज्यपाल पदाची शान सांभाळणारे एक उत्तुंग व्यक्तिमत्व आज काळाच्या ओघात आपल्यातून अंतर्धान पावलेले आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : महाराष्ट्राचे माजी राज्यपाल, एक अत्यंत उत्कृष्ट प्रशासक, आय.सी.एस. आणि त्यानंतर आय.ए.एस. झालेले व शासकीय सेवेमध्ये अत्यंत उत्कृष्टपणे काम करणारे, ज्या परीक्षांची आवश्यकता या देशामध्ये असते त्या उत्तीर्ण झालेले कै. पी. सी. अलेक्झांडर साहेब याचे काल केरळ राज्यामध्ये निधन झालेले आहे. ते एक विद्वत्तापूर्ण, एम.ए., एम.लिट्., एलएल.डी. अशा पध्दतीचे शिक्षण झालेले व्यक्तिमत्व होते. शासकीय सेवेत असताना भारत सरकारच्या अनेक महत्वाच्या खात्यांमध्ये काम करुन त्यानंतर पंतप्रधान कार्यालयाचे प्रधान सचिव म्हणूनही त्यांनी काम केले होते. युनायटेड किंग्डममध्ये सुध्दा त्यांनी उच्चायुक्त म्हणून काम केले होते. कै. पी.सी.अलेक्झांडर यांनी 10 वर्षापेक्षा जास्त काळ संयुक्त राष्ट्र संघात वरिष्ठ पदावर काम केले होते. त्यांनी स्व. इंदिरा गांधी व त्यानंतर स्व. राजीव गांधी यांच्या पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीत त्यांचे मुख्य सचिव म्हणूनही उत्कृष्ट काम केले होते. तामिळनाडूचे राज्यपाल आणि त्यानंतर प्रदीर्घकाळ म्हणजे 1993 ते 2002 पर्यंत महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून त्यांनी अनेक पध्दतीने या महाराष्ट्राची सेवा केली आहे.

घटनेच्या कलम 371(2) प्रमाणे स्थापन झालेल्या महाराष्ट्रातील वैधानिक विकास मंडळांच्या माध्यमातून विकासाच्या अनुषंगाने थोड्या मागास असलेल्या विभागांकरिता त्यांनी अत्यंत लक्षपूर्वक काम करुन विदर्भाला, मराठवाड्याला आणि उर्वरित महाराष्ट्राला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. एक उत्कृष्ट प्रशासक या नात्याने त्यांनी समाजामधील अनेक कार्यकर्त्यांशी जीवाभावाचा संपर्क ठेवला होता. शासकीय कर्मचारी असतील, अधिकारी असतील त्यांच्याशी सातत्याने महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास कसा होईल या दृष्टीने संपर्कही ठेवला होता. माझा आणि त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध होता. दुर्दैवाने देशातील अशा या अत्यंत कर्तबगार प्रशासकाचे निधन काल त्यांच्या केरळ राज्यामध्ये झालेले आहे. सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडलेला आहे आणि माननीय विरोधी पक्ष नेते तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी त्याला अनुमोदन दिलेले आहे. या दुखवट्याच्या ठरावामध्ये मी स्वत:ही सहभागी होत आहे. सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

सभापती .....

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

सभागृहाची बैठक मी 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.40 ते 1.55 पर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

<u>मावळ (जि.पुणे) येथील पवना धरणाबाबत आंदोलकांवर झालेल्या गोळीबारासंबंधी</u>

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मघाशी आम्ही महाराष्ट्राचे माजी राज्यपाल डॉ.पी.सी.अलेक्झांडर यांच्या दु:खद निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव मंजूर होण्यासाठी सहकार्य केले आहे.

सभापती महोदय, काल मावळ येथे घडलेली घटना गंभीर आहे. शासनाने एका शेतकऱ्याचा एन्काऊंटर केलेला आहे. काल आम्ही सरकारला जनरल डायरची उपमा दिली होती. परंतु हे सरकार त्याच्याही पलीकडे गेलेले आहे. हे सरकार शेतकऱ्याचाच एन्काऊंटर करणार असेल तर या सभागृहाचे कामकाज चालू शकत नाही. या सरकारने एका शेतकऱ्याचा एन्काऊंटर केला असल्यामुळे सरकारने राजीनामा दिला पाहिजे, अशा प्रकारची मी मागणी करीत आहे. अशा परिस्थितीत या सभागृहाचे कामकाज चालू शकत नाही.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये जमून घोषणा देत असतात.)

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण, उद्योग व सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो :-

(अ) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, 2011 प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी.2011/197/सीआर-77/नवि-32(1), दिनांकित 5 जुलै, 2011.

उप सभापती : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो :-

(ब) महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, 2011 प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी.2011/197/सीआर-77/नवि-32 (3), दिनांकित 5 जुलै, 2011.

उप सभापती : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन 2008-2009 चा बेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण विकास महामंडळ मर्यादितचा, सन 1999-2000 चा एकोणतीसावा वार्षिक अहवाल व लेखे सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल व लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 1998-1999 व सन 1999-2000 या वर्षाचा सोळावा व सतरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात.)

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2007-2008 पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन 2005-2006 या वर्षाचा सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात.)

पृ.शी./मु.शी.: अंदाज समितीचा अहवाल सादर करणे

श्री.मोहन जोशी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा दहावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

उप सभापती : अंदाज समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात.)

पृ.शी./मु.शी.: सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे

श्री.हेमंत टकले (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा सहावा व सातवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

उप सभापती : सार्वजनिक उपक्रम समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात.)

पृ.शी./मु.शी.: विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे

श्री.मोहन जोशी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषद आश्वासन समितीचा एकशे बासष्टावा, एकशे त्रेसष्टावा, एकशे चौसष्टावा व एकशे पासष्टावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

उप सभापती : विधानपरिषद आश्वासन समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

7....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात.)

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री.उल्हास पवार (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 12 ऑगस्ट, 2011 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 11 ऑगस्ट, 2011 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे वेळ देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

शुक्रवार, दिनांक 29 जुलै, 2011 रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले परंतु पुढे ढकलण्यात आलेले अशासकीय ठराव

1. श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक - 84 - 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2. श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक - 27 - 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
3. श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक - 7 - 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या ठरावास देण्यात यावा, अशीही शिफारस समितीने केली आहे.

उप सभापती : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य जोरजोराने घोषणा देत असतात.)

पृ.शी. : विदर्भ, मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाची मुदत वाढ व व कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ स्थापण्यास शासनाने दाखविलेली उदासीनता

मु.शी.: विदर्भ, मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाची मुदत वाढ व व कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ स्थापण्यास शासनाने दाखविलेली उदासीनता याबाबत श्री. रामदास कदम, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

उप सभापती : सभागृहामध्ये गोंधळाची स्थिती असल्यामुळे मंत्री महोदयांनी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवावे.

श्री. राजेंद्र मुळक (नियोजन मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबईतील ऑपेरा हाऊस परिसरातील जेम्स इंडिया लि. व अन्य 26 नोंदणीकृत हिरे व्यापा-यांनी बुडविलेला विक्रीकर

मु.शी.: मुंबईतील ऑपेरा हाऊस परिसरातील जेम्स इंडिया लि. व अन्य 26 नोंदणीकृत हिरे व्यापा-यांनी बुडविलेला विक्रीकर यासंबंधी श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

उप सभापती : सभागृहामध्ये गोंधळाची स्थिती असल्यामुळे मंत्री महोदयांनी निवेदन पटलावर ठेवावे.

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : गोदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यातील कडोतीटोल व मक्काटोला येथील श्रावणबाळ योजनेचा लाभ घेणा-या आणि चार वर्षापूर्वी मृत्यू झालेल्या लाभार्थ्याच्या खात्यात जमा होत असलेले पैसे

मु.शी.: गोदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यातील कडोतीटोल व मक्काटोला येथील श्रावणबाळ योजनेचा लाभ घेणा-या आणि चार वर्षापूर्वी मृत्यू झालेल्या लाभार्थ्याच्या खात्यात जमा होत असलेले पैसे, याबाबत सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर,विनोद तावडे व धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

उप सभापती : सभागृहामध्ये गोंधळाची स्थिती असल्यामुळे मंत्री महोदयांनी निवेदन पटलावर ठेवावे.

श्री. राजेंद्र मुळक (विशेष सहाय्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग श्री. महेश करजगावकर यांनी केलेला मनमानी कारभार व भ्रष्टाचार

मु.शी.: शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग श्री. महेश करजगावकर यांनी केलेला मनमानी कारभार व भ्रष्टाचार याबाबत सर्वश्री नागो गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, रणजित पाटील व भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

उप सभापती : सभागृहामध्ये गोंधळाची स्थिती असल्यामुळे मंत्री महोदयांनी निवेदन पटलावर ठेवावे.

श्री. राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 4 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नागपूर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात मराठीचा "फॉरेन लँग्वेज"मध्ये

केलेला समावेश

मु.शी.: नागपूर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात मराठीचा "फॉरेन लँगवेज"मध्ये केलेला समावेश यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

उप सभापती : सभागृहामध्ये गोंधळाची स्थिती असल्यामुळे मंत्री महोदयांनी निवेदन पटलावर ठेवावे.

श्री. राजेश टोपे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 5 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... 6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : बुलढाणा जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात झालेला वेतन घोटाळा

मु.शी.: बुलढाणा जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात झालेला वेतन घोटाळा यासंबंधी श्री. पांडुरंग फुंडकर,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

उप सभापती : सभागृहामध्ये गोंधळाची स्थिती असल्यामुळे मंत्री महोदयांनी निवेदन पटलावर ठेवावे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 6 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...7 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : पाथरी, जि.परभणी येथे बीओटी तत्वावर पंचायत समिती व व्यापारी संकुले उभारणीच्या शासन निर्णयाचे कंत्राटदाराने केलेले उलंघन

मु.शी.: पाथरी, जि.परभणी येथे बीओटी तत्वावर पंचायत समिती व व्यापारी संकुले उभारणीच्या शासन निर्णयाचे कंत्राटदाराने केलेले उलंघन याबाबत श्री. दिवाकर रावते, वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

उप सभापती : सभागृहामध्ये गोंधळाची स्थिती असल्यामुळे मंत्री महोदयांनी निवेदन पटलावर ठेवावे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 7 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...8 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्यात सहवीज निर्मिती करण्याबाबत शासनाची उदासीन भूमिका

मु.शी.: राज्यात सहवीज निर्मिती करण्याबाबत शासनाची उदासीन भूमिका याबाबत सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते व धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

उप सभापती : सभागृहामध्ये गोंधळाची स्थिती असल्यामुळे मंत्री महोदयांनी निवेदन पटलावर ठेवावे.

श्री.प्रकाश सोळंके (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 8 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...9 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : श्री. प्रसन्न विठ्ठल कदम रा.तळेगाव-दाभाडे (जि.पुणे) यांच्यावर झालेला हल्ला

मु.शी.: श्री. प्रसन्न विठ्ठल कदम रा.तळेगाव-दाभाडे (जि.पुणे) यांच्यावर झालेला हल्ला याबाबत सर्वश्री. जयंत प्र. पाटील व कपिल पाटील,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

उप सभापती : सभागृहामध्ये गोंधळाची स्थिती असल्यामुळे मंत्री महोदयांनी निवेदन पटलावर ठेवावे.

श्री.सतेज उर्फ बंटी डी. पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 9 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...10 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : एम.बी.बी.एस.साठी भारतात होणा-या "नीट" (नॅशनल एलिजिबिलिटी ॲण्ड एण्ट्रन्स टेस्ट) अभ्यासक्रमाबाबत शासनास असलेली अनभिज्ञता

मु.शी.: एम.बी.बी.एस.साठी भारतात होणा-या "नीट" (नॅशनल एलिजिबिलिटी ॲण्ड एण्ट्रन्स टेस्ट) अभ्यासक्रमाबाबत शासनास असलेली अनभिज्ञता याबाबत डॉ. दीपक सावंत,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

उप सभापती : सभागृहामध्ये गोंधळाची स्थिती असल्यामुळे मंत्री महोदयांनी निवेदन पटलावर ठेवावे.

श्री.डी.पी.सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 10 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...11 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : बांद्रा रेक्लमेशन येथील इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या माणिक विद्यालया लगतचे मैदान विद्यार्थ्यांना खेळासाठी उपलब्ध करुन देण्याची केलेली मागणी

मु.शी.: बांद्रा रेक्लमेशन येथील इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या माणिक विद्यालया लगतचे मैदान विद्यार्थ्यांना खेळासाठी उपलब्ध करुन देण्याची केलेली मागणी याबाबत सर्वश्री. कपिल पाटील व जयंत प्र.पाटील यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 11 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..12 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाने अनेक सन्माननीय सदस्य जोरजोराने घोषणा देत असतात.)

श्री. कपिल पाटील : निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, सदर जागा खेळाचे मैदान म्हणून आरक्षित नसल्यामुळे व ही जागा मोकळा भूखंड असल्याने इतर कोणत्याही कारणसाठी देता येत नाही. शाळेतील मुलांचा शिक्षणाचा आणि खेळण्याचा हक्क आहे. तेव्हा हे मैदान मोकळे असेल तर ते मुलांना खेळण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?

श्री. सचिन अहिर : जेथे आरजीपीजी असेल तेथे मैदान खेळासाठी उपलब्ध करुन देता येते. परंतु म्हाडाचा ओपन प्लॉट असेल तर तो अशा त-हेने खेळासाठी देता येत नाही. सन्माननीय सदस्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी हे मैदान देण्याची मागणी केलेली आहे. त्याबाबतीत

सहानुभूतीपूर्वक विचार करण्याची भूमिका घेण्यात येईल. मी स्वत: या बाबतीत बैठक घेऊन निर्णय घेण्याचा प्रयत्न करीन.

(विरोधी पक्षाने अनेक सन्माननीय सदस्य जोरजोराने घोषणा देत असतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : खामगाव, जि.बुलढाणा येथील शासकीय तंत्र निकेतनातील विद्यार्थी श्री.सारंगधरसिंह चौहान याच्या विरुध्द घडविलेले खोट कॉपी प्रकरण

मु.शी.: खामगाव, जि.बुलढाणा येथील शासकीय तंत्र निकेतनातील विद्यार्थी श्री.सारंगधरसिंह चौहान याच्या विरुध्द घडविलेले खोट कॉपी प्रकरण याबाबत श्री. पांडुरंग फुंडकर,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

उप सभापती : सभागृहामध्ये गोंधळाची स्थिती असल्यामुळे मंत्री महोदयांनी निवेदन पटलावर ठेवावे.

श्री. राजेश टोपे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 12 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...14 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

उप सभापती : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटासाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.06 ते 2.16 पर्यन्त स्थगित झाली.)

...नंतर श्री. भोगले....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

सभापतीस्थानी माननीय उप सभापती

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य मोकळ्या मार्गिकेमध्ये येऊन घोषणा देत असतात)

पृ.शी.: मुंबईच्या समुद्रात दोन महिन्यात तीन जहाजे बुडण्याच्या घटना घडणे

मु.शी.: मुंबईच्या समुद्रात दोन महिन्यात तीन जहाजे बुडण्याच्या घटना घडणे या विषयावर डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून माननीय पर्यावरण राज्यमंत्र्यांचे निवेदन.

उप सभापती : सभागृहामध्ये गोंधळाची स्थिती असल्यामुळे मंत्री महोदयांनी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवावे.

श्री.सचिन अहिर (उद्योग व पर्यावरण राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "मुंबईच्या समुद्रात दोन महिन्यात तीन जहाजे बुडण्याच्या घटना घडणे" या विषयासंबंधी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून मी पुढील निवेदन करीत आहे.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य मोकळ्या मार्गिकेमध्ये येऊन घोषणा देत असतात)

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>कामकाज पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना व विशेष उल्लेखाच्या सूचनेसंबंधी</u>

उप सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवरील कोणतीही लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येणार नाही तसेच विशेष उल्लेखाच्या सूचना देखील घेण्यात येणार नाहीत.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य मोकळ्या मार्गिकेमध्ये येऊन घोषणा देत असतात)

पृ.शी.: स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक.

L.A.BILL No.XXV OF 2011

(A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT OF SELF-FINANCED UNIVERSITIES IN THE STATE ; TO REGULATE THEIR WORKING AND FUNCTIONS AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य मोकळ्या मार्गिकेमध्ये येऊन घोषणा देत असतात)

श्री.राजेश टोपे (उच्च शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक-25 राज्यात स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांची स्थापना करण्याची तरतूद करण्यासाठी, त्यांच्या कामकाजाचे व कार्याचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य मोकळ्या मार्गिकेमध्ये येऊन घोषणा देत असतात)

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक-25 राज्यात स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांची स्थापना करण्याची तरतूद करण्यासाठी, त्यांच्या कामकाजाचे व कार्याचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय उच्च शिक्षणमंत्र्यांनी विधानसभेने पारित केलेले सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक-25 राज्यात स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांची स्थापना करण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक मांडले आहे. अशा प्रकारचे विधेयक हे घटनेच्या विरोधात आहे. ज्या संविधानाच्या आधारे हे सभागृह निर्माण झाले, ज्या उद्दिष्टासाठी निर्माण झाले त्या सभागृहाच्या उद्दिष्टांना हरताळ फासणारे हे विधेयक आहे. म्हणून माननीय मंत्रीमहोदयांना हे विधेयक मांडता येणार नाही. त्यामुळे ते विधानसभेकडे परत पाठविले पाहिजे, असा माझा मुद्दा आहे. मंत्री महोदयांनी विधेयकाचा उद्देश सांगितला आहे त्यात असे म्हटले आहे की, "उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात खाजगी क्षेत्राचा सहभाग सुकर करण्याचे ठरविले आहे."

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

सभापती महोदय, अनेक घटनात्मक मुद्दे आहेत. हे बिल मुळात घटनाविरोधी आहे. मुळामध्ये दलितांच्या विरोधात आहे. हे बिल संविधानाने ज्यांना संरक्षण दिले त्या आदिवासींच्या विरोधात आहे. हे बिल ज्या मागासवर्गीयांना संविधानाने संरक्षण दिले त्या मागासवर्गीयांच्या विरोधात आहे. हे बिल या सगळ्या घटकांच्या विरोधात आहे म्हणून हे बिल माननीय मंत्री महोदयांना मांडता येणार नाही. सभापती महोदय, हे बिल मांडत असताना असे म्हटले आहे की, "अशा विद्यापीठांना खात्रीपूर्वक समुचित आणि सुयोग्य वातावरण देऊन शासनाने राज्यातील उच्च शिक्षणाच्या विकासाला चालना देणाऱ्या उत्तम समन्वयकाची भूमिका बजावणे देखील शासनास इष्ट वाटते." पुढे असे म्हटले आहे की, "ज्या खाजगी संस्थांनी उच्च शिक्षणाचे अभ्यासक्रम तयार करुन ते अत्यंत उत्कृष्ट रीतीने राबविले आहेत अशा खाजगी संस्थांना राज्यात विद्यापीठ स्थापन करण्यासाठी परवानगी देण्याची प्रक्रिया सुरु करण्याचे ठरविले आहे."....

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सदनात जे भाष्य केले व सूचना केल्या त्या तपासून शासन विचार करील.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

....5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

खंड 2 ते 47 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझे भाषण पूर्ण झालेले नाही. मला या बिलावर अधिक भाष्य करावयाचे आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 25 संमत करण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती: सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 25 संमत झाले आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय सभापतींसमोरील जागेत घोषणा देत असतात व सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे आपल्या जागेवरुनच विधेयक क्र. 25 वर बोलत असतात.)

पृ.शी.:: सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XCI OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.)

श्री. प्रकाश सोळंके (सहकार राज्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि.स.वि.क्र. 91-महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्र. 91-महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्र. 91 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2011 चे वि.स.वि. क्र 91 संमत झाले आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XXIX OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949 AND THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948.)

AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE THEREON.

श्री. भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि.स.वि.क्र. 29 - मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक, 2011मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. भास्कर जाधव : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्र. 29- मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उप सभापती : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी दिलेला आहे, त्यांनी तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही)

उप सभापती : यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी दिलेला आहे. त्यांनी तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

.....3

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील बोलत असतात)

उप सभापती : यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा तिसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिलेला आहे. त्यांच्यापैकी एकाने तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही)

उप सभापती : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 56 (दोन्ही सम्मिलीत) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. भास्कर जाधव : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्र. 29, संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2011 चे वि.स.वि. क्र 29 संमत झाले आहे.

विरोधी पक्षाच्या वतीने कामकाज पत्रिकेवर दाखविलेला अंतिम आठवडा प्रस्ताव तसेच सत्ताधारी पक्षाकडून देण्यात आलेला नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव असे दोन्ही प्रस्ताव उद्याच्या कामकाजात घेण्यात येतील. सर्वप्रथम विरोधी पक्षाकडून आलेला अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 12 ऑगस्ट, 2011 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल.

सकाळी 10 ते 12.00 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल, सदर बैठकीत विरोधी पक्षाकडून देण्यात आलेला व आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविलेला अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल. त्यानंतर दुपारी 12.15 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 30 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 12 ऑगस्ट, 2011 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही